आर्थिक । राजकीय । सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

शेतकरी संघटक

६ डिसेंबर २०११ । वर्ष २८ । अंक १७

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹१०

कापसाचा तिढा एक होऊन लढा

सरकारच्या सर्वंकष धोरणांचा विचार करून 'शेतकरी तितुका एक' या भावनेने आंदोलनाची उभारणी करावी लागेल. आगामी लोकसभा निवडणुकीपूर्वी भारतातील शेतकरी एकत्र येऊन निर्णायक लढ्यासाठी सिद्ध झाले तरच त्यांची 'शेतकरीविरोधी धोरणा'च्या कचाट्यातून मुक्तता होऊ शकेल, अन्यथा किती वर्षे वाट पाहावी लागेल, हे सांगता येत नाही!

शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्याचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक १७ । ६ डिसेंबर २०११

मूल्य : ₹ १०

संपादक
सुरेशचंद्र म्हात्रे

कार्यकारी संपादक
श्रीकांत उमरीकर

सल्लागार संपादक
डॉ. मानवेंद्र काचोळे
डॉ. गिरधर पाटील

साहाय्यक संपादक
ज्ञानेश्वर शेलार

मुखपृष्ठ/अंक मांडणी
श्रीकांत झाडे

वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ

(टीप : वर्गणीदारांनी अंकांसंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)
संपर्क : कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१, फोन : ०२४०-२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

आदरांजली

दि. १० डिसेंबर १९८६ रोजी सुरेगाव, जि. हिंगोली येथील कापूस आंदोलनामध्ये पोलिसांनी केलेल्या गोळीबारात तीन शेतकरी हुतात्मे झाले. शेतकरी संघटनेच्या वतीने त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

हुतात्मा कै. परसरामजी कऱ्हाळे
हुतात्मा कै. निवृत्तीराव कऱ्हाळे
हुतात्मा कै. ज्ञानेश्वर टोणपे

अंतरंग

जागरण
कापसाची दशा, दिशा आणि दुर्दशा
गंगाधर मुटे ३

अर्थात
कापसाचा सरकारी गुंता
श्रीकृष्ण उमरीकर ६

विचार
कापसाचा तिढा : एक होऊन लढा
अमर हबीब ८

आजकाल
वॉलस्ट्रीट ते लाल किल्ला व्हाया वॉलमार्ट
ज्ञानेश्वर शेलार ९

कॉमन नॉन सेन्स
अण्णांच्या देवळात अराजकाची पूजा
सुधाकर जाधव १०

वृत्तांत
वो सुबह अब तो आएगी
अनंत उमरीकर १२

शेतकरी संघटना वृत्त १४

वित्तप्रवाहाचे डबके करणार काय?

रिटेलक्षेत्रात परकीय गुंतवणूक व्हावी की नाही यावर मोठा गदारोळ माजवला जात आहे. बरोबर २० वर्षांपूर्वी डंकेल प्रस्तावाबाबत असाच धुराळा उडविण्यात आला होता. तेव्हा डंकेलला विरोध करणारे आज परत त्याच आवेशात एफडीआयला विरोध करत आहेत. गंमत म्हणजे राजकीयदृष्ट्या पंगू झालेले डावे आणि राजकीयदृष्ट्या नंबर एक होऊ पाहणारे उजवे, दोघेही परत गळ्यात गळे घालून या मोहिमेत आकांडतांडव करीत आहेत. खरे तर भारतीय जनता पक्षाला इतकी चांगली सुवर्णसंधी या निमित्ताने लाभली होती- या मुद्द्यावर काँग्रेसी संसदेत सहकार्य करायचं, समाजवादी पक्ष, बसपा, द्रमुक आणि इतर छोटे मोठे किरकोळ पक्ष यांना डाव्यांसोबत एकाकी पाडायचं. जेणेकरून भारताचा मुख्य राजकीय प्रवाह कुठल्या दिशेने जातो आहे हे स्पष्ट झालं असतं. थेट परकीय गुंतवणुकीचं जे सुतोवाच यशवंत सिन्हा अर्थमंत्री असताना केलं होतं. त्याच मार्गावरून आम्ही पुढे जात आहोत, असंही त्यांना म्हणता आलं असतं; पण आपल्याला बुद्धि नसल्याचा पुरावा वारंवार देणे ही संघ परिवाराची खोड भाजपलाही लागली असावी.

अर्थमंत्री म्हणून मनमोहन सिंग यांनी नरसिंहराव सरकारच्या काळात मोठ्या ठामपणे खुल्या धोरणांचा पाठपुरावा केला होता. किंबहुना यासाठीच त्यांची नेमणूक झाली, असं सगळ्यांचंच मत होतं. २००४ साली इंडिया शायनिंगला पूर्णपणे अंधारात ढकलून संयुक्त पुरोगामी आघाडी तयार झाली. तेव्हा त्याच्या नेतेपदी बसविण्यासाठी मनमोहन सिंगांशिवाय दुसरं कुणी सापडलं नाही. याला कारण त्यांची ही प्रतिमाच होती. ज्या कारणासाठी त्यांना पंतप्रधानपदी बसवलं. नेमकं त्याच गोष्टींकडे त्यांनी पाठ फिरवायला सुरुवात केली. संपुआच्या पहिल्या काळात हे सगळं डाव्यांच्या नावाखाली झाकून गेलं. काँग्रेसचा पाठींबा काढून डाव्यांनीही भाजप आणि संघ परिवार यांच्याशी स्पर्धा करत आपलीही बुद्धि भ्रष्ट झाल्याचं जाहीर केलं. परिणामी, स्वाभाविकपणे भारतीय मतदारांनी आधी त्यांना लोकसभेत आणि नंतर त्यांच्या हक्काच्या पश्चिम बंगालमधूनसुद्धा हद्दपार केलं. या सगळ्याचा कुठलाही बोध घेण्याची तयारी डाव्यांची नाही.

अण्णा हजारे आणि रामदेव बाबा यांच्याबाबत काही बोलणंच मुश्किल झालं आहे. अर्थशास्त्र या विषयातलं त्यांना काहीही कळत नाही. या विषयातील अगदी ढोबल गोष्टीही त्यांना समजत नाहीत. कुठल्यातरी वरवरच्या आणि उथळ अशा लोकभावनेला हात घालण्याची एक विलक्षण खोडच त्यांना सध्या लागलेली दिसते आहे. त्यांनी भ्रष्टाचाराला हात घातला, सामान्य जनतेला हा विषय स्पर्शून गेला आणि त्यांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद अण्णांना दिला. रामदेव बाबा काळ्या पैशांबाबत बोलायला लागले. तोही विषय सर्वसामान्यांना स्पर्शून गेल्याने सर्व लोक बाबांकडे आशेने पाहायला लागले. आजूबाजूला सत्तेच्या नशेत आकंठ बुडालेले राजकीय नेते पाहत असताना सामान्यांचा ओढा नैसर्गिकरीत्या अण्णा आणि बाबांकडे गेला. लोकांनी आपल्याला प्रतिसाद का दिला, हे समजून न घेता नको ती हवा अण्णा आणि बाबांच्या डोक्यात शिरली, परिणामी एफडीआयच्या किचकट आणि गुंतागुंतीच्या विषयातही त्यांनी हात घातला. सध्या आपली अर्थव्यवस्था मोठ्या कठीण स्थितीतून जात आहे. इतर क्षेत्रांत परकीय गुंतवणूक सुरू झालेली आहे. मग फक्त रिटेल क्षेत्रात त्याला विरोध करून नेमकं काय साधणार आहे? गेली दहा वर्षे या क्षेत्रात भारतीय कंपन्यांना (रिलायन्स, मोर, बिग बाजार) मॉल उभारण्याची परवानगी देण्यात आली होती. त्याप्रमाणे त्यांनी विविध शहरांमध्ये असे मॉल उघडलेही; पण अजूनही या मॉलमधील उलाढालीचा एकूण रिटेल क्षेत्राशी असलेला हिस्सा दोन आकडीसुद्धा नाही. मग, ही परिस्थिती असताना वॉलमार्टसारख्या कंपन्या आल्या, तर असा कितीसा मोठा फरक पडणार आहे. मोठ्या मॉलला परवानगी देत असताना शेतमाल आणि इतर उत्पादनांसाठी मोठमोठी शीतगृहे साठवणुकीची चांगली व्यवस्था, पॅकेजींगची अद्ययावत यंत्रणा या सगळ्यांवरती किमान ५०% गुंतवणूक करण्याची अट शासनाने घातली आहे. गेल्या १० वर्षांत भारतीय कंपन्यांनी हे का केले नाही? यामुळे शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला असता, त्यांच्या उत्पादनांना देशाच्या बाहेर तर सोडाच, देशांतर्गतही चांगला भाव मिळाला असता. शेतमाल खरेदीचा भारतभर पसरलेला गबाळग्रंथी कारभार पाहिला तर या गोष्टींची किती नितांत आवश्यकता आहे, हे वेगळं सांगायची गरज नाही. २०११ हे वर्ष संपत असताना खुलीकरणाचे धोरण स्वीकारून २० वर्षे उलटली असताना गल्लीतला छोटासा दुकानदारही इलेक्ट्रॉनिक्स वजनकाटे वापरत असताना आजही कृषी उत्पन्न बाजार समितीत मात्र इलेक्ट्रॉनिक्स वजनकाटे लावले गेले नाहीत. माथाडी कायद्यासारखा अतिशय जुनाट कायदा तिथे अजुनही अस्तित्वात आहे. शेतकऱ्याने स्वत:चा शेतमाल स्वत:च्या पाठीवरून वाहून नेला तरी हमालीपोटी विशिष्ट रक्कम त्याच्या बिलातून आजही वजा होते. याबद्दल एफडीआयला विरोध करणारे का आवाज उठवत नाहीत. इंग्रजांच्या शैक्षणिक धोरणाचं स्वागत करत असताना महात्मा फुले जळजळीतपणे असं म्हणाले होते, 'बरं झाले, इंग्रज आले; नसता या भट-ब्राह्मणांनी आमच्या पोरांना शिकूच दिले नसते.' याच जळजळीतपणे आज सामान्य शेतकरी वॉलमार्टचं स्वागत करायला तयार आहे. कारण, जे खुलं धोरण इतर क्षेत्रांत आलं ते शेतीमध्ये आजपर्यंत येऊ दिल्या गेलं नाही. सगळा भारत इंडिया शायनिंग करत असताना, शेतकरी मात्र अंधारातच राहावा, असं धोरण ९१ नंतरच्या सगळ्या शासनांनी मन:पूर्वक राबवलं. शेवटी परिस्थिती नियंत्रणाच्या बाहेर जाते हे पाहून अपरिहार्यपणे मनमोहनसिंग यांना थेट परकीय गुंतवणुकीला परवानगी द्यावी लागते आहे. स्थानिक राजे-रजवाडे सामान्य जनतेला छळत होते; परिणामी परकीय आक्रमक अगदी मूठभर संख्येने का असेना आले आणि त्यांनी इथल्या राजांचा पराभव केला. त्यामागचं इंगित हेच! सर्वसामान्य शेतकरी तेव्हा आपल्या शेतातच कमरेवर हात ठेवून उभा होता.

आज शेतकऱ्याला लुबाडणारी बाजारव्यवस्था, राज्यकर्ते, शेतकरी विरोधी धोरणे सगळ्याला झुगारून देण्यासाठी एक हत्यार त्याच्या हाती यायची शक्यता आहे आणि दुसरीकडून सामान्य ग्राहकही त्याला स्वच्छ, स्वस्त आणि दर्जेदार वस्तू मिळण्याची आशा करतो आहे. स्थानिक दुकानदारांच्या यंत्रणेने आजतागायत ग्राहकाच्या निवड स्वातंत्र्याचा कधीही विचार केला नाही. प्रचंड मोठ्या संख्येने असलेल्या शेतकरी आणि ग्राहकांपेक्षाही किरकोळ दुकानदार, माथाडी कामगार यांच्या बोटावर मोजता येतील इतक्या संख्येसाठी घसा कोरडा करणाऱ्या डाव्या आणि उजव्यांची, अण्णा आणि बाबांची कीव करावी वाटते ती त्यामुळेच! वित्तप्रवाह खेळता ठेवला तरच देशाचं आणि पर्यायानं अरिष्टात सापडलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेचं हित आहे नसता या प्रवाहाचे डबके झाल्याशिवाय राहणार नाही.

कापसाची दशा, दिशा आणि दुर्दशा

कापसाला भाव मिळू नये हे सरकारचे धोरण आहे, असे अधिकृत पुरावेच आता समोर यायला लागले आहेत. कापसाची दशा अशी करून ठेवली आहे, की शेतकऱ्याला आत्महत्येची दिशा पकडण्याखेरीज दुसरा मार्ग उरू नये. त्याची दुर्दशा झाली की आपलं भलं होईल, या नादात हे सरकार स्वत:च्या पायावर धोंडा पाडून घेत आहे. मुक्त अर्थव्यवस्थेचा जयघोष करत असताना शेतकऱ्याला मात्र कोंडून ठेवण्याचं हे कसब विलक्षण आहे.

गंगाधर मुटे

यंदा पुन्हा एकदा कापसाच्या भावाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे आणि या निमित्ताने कापसाच्या उत्पादन खर्चाचा प्रश्न चव्हाट्यावर मांडला जात आहे. शेतमालास उत्पादन खर्चानुसार रास्त भाव मिळावेत, ही शेतकरी संघटनेची प्रारंभापासूनची भूमिका राहिली आहे. शेतकरी संघटनेचे प्रणेते मा. शरद जोशी विदेशातील गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून भारतात आल्यानंतर त्यांनी केंद्र सरकारचा कृषिमूल्य आयोग चुकीच्या उत्पादन खर्च काढण्याच्या पद्धती वापरून व त्या आधारे शेतमालाच्या किंमती कमी ठेवून भारतीय शेतकऱ्यांचे कसे शोषण करतो, हे पहिल्यांदाच शास्त्रशुद्ध पद्धतीने भारतीय शेतकऱ्यांना शिकविले.

सरकार हे शेतकऱ्यांचे मायबाप असते मात्र शेतमालाला कमी भाव मिळण्याचे कारण व्यापारी असून व्यापारीच शेतकऱ्यांना लुबाडतात, असाच सार्वत्रिक समज शरद जोशी भारतात येईपर्यंत तरी प्रचलित होता. शरद जोशींनी या प्रचलित गृहितकालाच कलाटणी देऊन शेतकऱ्याचे मरण हेच सरकारचे अधिकृत धोरण असते, शेतीमालाला त्याचा उत्पादन खर्च भरून निघणार नाही एवढे कमी भाव देण्यासाठी सरकार नानाविध क्लृप्त्या वापरून शेतीमालाचे भाव नियंत्रित करत असते, असे ठामपणे मांडले.

तीस वर्षांच्या शेतकरी संघटनेच्या इतिहासाकडे मागे वळून पाहताना एक बाब अगदी स्पष्टपणे जाणवते की, शेतीच्या दुर्दशेला केवळ सरकार आणि सरकारची शेतीविरोधी धोरणेच कारणीभूत आहे, या शेतकरी संघटनेच्या विचाराला आता जगन्मान्यता मिळाली आहे. शेतीविषयात वैचारिक क्रांती घडवून आणण्यात शेतकरी संघटनेला निर्भेळ यश प्राप्त झाले आहे.

कापसाचे उत्पादन मूल्य काढण्याची सदोष शासकीय पद्धत :

खरीप २०१०-११ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या कृषिमूल्य निर्धारण समीतीने कापसाचा उत्पादन खर्च जाहीर केला (तक्ता क्र. १) त्यात अनेक दोष आहेत. पुरुष शेतमजुरीचा दर ९२/- रुपये तर महिला शेतमजुरीचा दर ५६/- रु. हिशेबात धरला आहे. वास्तविकत: शेतमजुरीचा दर निश्चित करताना पुरुष आणि महिला असा भेदभाव करण्याचे काहीच कारण नाही. शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन पुरुषांना वेगळे आणि महिलांना वेगळे देण्याची खुद्द शासनाची पद्धत नाही. केंद्र सरकारच्या १९४८च्या

तक्ता क्रं. १ Apendix - L (I)

Per hectare item-wise cost of cultovation of kharif crop "Cotton (Long staple)" in Maharashtra for 2010-11 Marketing Season

Sr. No.	Items		Units	Inputs per hectare	Cost per unit of inputs (Rs)		Total cost per hectare (Rs.)
1	Hired Human Labour	Male	Days	19.47	92.00		1,791.24
		Female	Days	92.71	56.00		5,191.76
2	Bullock Labour		Pair Days	19.62	295.00		5,787.90
3	Machinery Charges		Rs	-	-		1,007.55
4	Seed		Kg	1.62	1,518.00		2,459.16
5	Manure		Cartload	6.15	256.00		1,574.40
6	Fertilizers (In terms of nutrients)	N	Kg	61.12	10.50	641.76	
		P	Kg	43.00	21.63	930.09	
		K	Kg	19.95	7.43	148.23	
	Sub Total 6		Rs			1,720.08	1,720.08
7	Irrigation Charges		Rs				243.47
8	Insecticides		Rs				1,155.43
9	Insurance Charges		Rs				1,239.04
10	Incidental Charges		Rs				242.55
	Working Capital (Item 1 to 10)		Rs				22,412.58
11	Interest on working capital		Rs				672.38
12	Land revenue, cess,& taxes		Rs				39.69
13	Depreciation on implements & farm buildings		Rs				441.73
	Cost A1		Rs				23,566.38
	Cost A2 (A1+rent paid for leased in land)		Rs			3,249.27	-
	Cost A2F1 (A2+Family Labour)		Rs				26,815.65
14	Interest on Fixed capital		Rs				770.24
	Cost B1(A1+Interest on fixed capital)		Rs				24,336.62
15	Rental Value of Land		Rs				6,215.31
	Cost B2(B1+Rental Value of Land+ rent paid for leased in land)		Rs				30,551.93
16	Family Human Labour	Male	Days	23.12	92.00		2,127.04
		Female	Days	20.04	56.00		1,122.24
	Cost "C1" (B1+Family labour)		Rs				27,585.90
	Cost "C2" (B2+Family labour)		Rs				33,801.21
17	yield per hectare		Qtls				12.51
18	Per Quintal cost C2		Rs/Qtls				2,701.93
	Per Quintal Marketing Charges		Rs/Qtls				133.50
	Per Quintal Transport Charges		Rs/Qtls				45.00
	Cost C2 (Per Quintal)		Rs/Qtls				2,880.43
19	Cost C3 (C2+10% of C2)*		Rs/Qtls				3,168.48
20	Value Of main produce per hectare		Rs				39,637.66
21	Value Of bi-produce per hectare		Rs				-
22	Per Quintal cost of cultivation		Rs				3,168.48

* It is sugested that following additional amt (per Qtls cost) be consider other than price quoted above for the benefit of farmer iterest on working capital (half yearely) 53.79 53.75
15% Profit on cost of cultivation 475.27
Per quintal praposed cost of cultivation 3,697.54

Note : Transport Charges & Marketing Charges are included in cost C2 as recommonded by Alagh Committee.

किमान वेतन कायद्यानुसार, किमान वेतन दरांमधील दुरुस्ती १ ऑक्टोबर २०१० रोजी करण्यात आली. राज्य सरकारी पातळीवर यामधील दुरुस्त्या वेळोवेळी झाल्या आहेत. अधिसूचित रोजगारांसाठी ठरवून दिलेले किमान वेतनाचे दर, शेतीक्षेत्रासहीत, सर्व संघटीत तसेच असंघटीत उद्योगांना लागू आहेत. केंद्र आणि राज्य सरकारी पातळीवरील सर्व अधिसूचित रोजगारांमधील अकुशल कामगारांसाठीच्या किमान वेतनाची तसेच शेतीक्षेत्रातील अधिसूचित रोजगारांमधील अकुशल कामगारांसाठीचे किमान वेतनाचे दर केंद्रपातळीवर रु. १६३/- आणि महाराष्ट्र राज्य पातळीवर रु. १२०/- असताना आणि त्यात महिला व पुरुष असा भेदभाव केला नसताना कृषिमूल्य निर्धारण समितीने कापसाचा उत्पादन खर्च काढताना किमान वेतन कायद्याने ठरवून दिलेल्या वेतनापेक्षा कमी धरणे हा कायदेशीर गुन्हाच ठरायला हवा.

तक्ता क्र. १ वरून नजर फिरविली तरी शासकीय उत्पादन खर्च काढताना झालेल्या किंवा जाणूनबुजून केलेल्या चुका व त्रूटी सहजपणे लक्षात येईल. शेतीमालाचा उत्पादनखर्च काढताना सदोष कार्यपद्धती आणि चुकीची आकडेवारी वापरून सरकार दुहेरी बदमाशी करत असल्याचे ठळकपणे जाणवायला लागते. कृषीमूल्य आयोग किंवा कृषीमूल्य निर्धारण समिती ज्या सदोष पद्धतीने कापसाचा उत्पादन खर्च काढते, त्याच तक्त्यात जर वस्तुनिष्ठ आकडे घातले तरी कापसाचा उत्पादन खर्च ७९६६/- रु. प्रति क्विंटल एवढा निघतो. (तक्ता क्र. २)

तक्ता क्र. २ मध्ये कापसाचा उत्पादन खर्च प्रतिक्विंटल ७९६६/- रुपये निघत असला तरी या उत्पादन खर्चाला शास्त्रशुद्ध उत्पादनखर्च म्हणता येणार नाही, कारण यामध्ये अनेक लागवडी व अन्य खर्च समाविष्ट झालेले नाहीत, उदा. हिशेबामध्ये शेतीला ६ टक्के व्याजदराने वित्तपुरवठा केला जातो असे गृहीत धरून सहा महिने खेळते भांडवल या तऱ्हेने ३ टक्के व्याज धरले गेले आहे; परंतु बँका शेतकऱ्याच्या घरात नसतात, तालुक्याच्या ठिकाणी असतात. बँकेपर्यंत जायला प्रवासखर्च येतो, नोड्यू काढायला अवांतर बँकांकडे रीतसर पैसे भरायला लागतात. शेत गहाण करायला स्टॅम्पड्युटी लागते, अन्य कागदपत्रे गोळा करायला खर्च येतो याकडे साफ दुर्लक्ष केले गेले आहे.

शास्त्रशुद्ध उत्पादन खर्च कसा असेल?

कापसाचा उत्पादन खर्च

प्रमाण : १ शेतकरी १० एकर कापसाची शेती.

उत्पादनखर्च १० एकर कापूस पिकाचा खालीलप्रमाणे.

अ) भांडवली खर्च :

१) शेती औजारे-खरेदी/दुरुस्ती	:	२०,०००.००
२) बैल जोडी	:	८०,०००.००
३) बैलांसाठी गोठा	:	१,००,०००.००
४) साठवणूक शेड	:	१,००,०००.००
एकूण भांडवली खर्च	:	**३,००,०००.००**

ब) चालू खर्च (खेळता भांडवली खर्च)

१) शेण खत	:	१,२०,००० रु.
२) नांगरट करणे	:	८,००० रु.
३) ढेकळे फोडणे, सपाटीकरण	:	४,००० रु.
४) काडीकचरा वेचणे	:	८,०००.०० रु.
५) बियाणे	:	१८,६०० रु.
६) लागवड खर्च	:	८,००० रु.
७) खांडण्या भरणे	:	२,००० रु.
८) निंदणी / खुरपणी खर्च (दोन वेळा)	:	१५,००० रु.
९) रासायनिक खत मात्रा	:	२४,००० रु.
१०) रासायनिक खत मात्रा- मजुरी खर्च	:	८,००० रु.
११) सूक्ष्म अन्नद्रव्य	:	७,००० रु.
१२) किटकनाशके	:	३०,००० रु.
१३) फवारणी मजुरी	:	६,००० रु.
१४) कापूस वेचणी (६० क्विंटल)	:	५२,००० रु.
१५) वाहतूक/ विक्री खर्च	:	५,००० रु.
१६) बैलाची ढेप/पेंड	:	३,००० रु.
१७) बांधबंदिस्ती/सपाटीकरण खर्च	:	२०,००० रु.
एकूण खेळते भांडवली खर्च	:	**३,३८,६०० रुपये**

१) भांडवली खर्चावरील व्याज	:	३२,०००.००
२) चालू गुंतवणुकीवरील व्याज	:	३०,०००.००
३) भांडवली साहित्यावरील घसारा	:	३२,०००.००
क) एकूण खर्च १+२+३	:	**९४,०००.००**

अ) खेळत्या भांडवली खर्चावरील व्याज	:	६६,००० रु.
ब) एकूण खेळते भांउवली खर्च	:	३,६८,६०० रु.
क) एकूण उत्पादन खर्च १+२+३	:	**४,९८,६०० रु.**

निष्कर्ष

१) १० एकरात ६० क्विंटल कापूस पिकविण्याचा खर्च : ४,९८,६०० रु.

२) १ एकरात ६ क्विंटल कापूस पिकविण्याचा खर्च : ४९,८६० रु.

म्हणजेच प्रतिक्विंटल कापसाचा किमान उत्पादन खर्च हा ८३१० रु. एवढा निघतो.

टीप :

१) दर चार वर्षांतून एकदा शेतीमध्ये ओला किंवा कोरडा दुष्काळ हमखास पडतच असतो. त्यामुळे उत्पादन खर्च काढताना चार वर्षांच्या लागवडीचा खर्च तीन वर्षांच्या उत्पादनावर/पीकांवर लावणे गरजेचे आहे. अशा तऱ्हेचा निकष औद्योगिक उत्पादनाचे मूल्य ठरविताना लावले जातच असते. त्या हिशेबाने प्रतिक्विंटल कापसाचा उत्पादन खर्च १०,४०० रुपयांवर जातो.

२) लागवडी खर्चामध्ये किरकोळ खर्च, बैलांचा चारा, बैलांचा इन्शुरन्स धरला तर प्रति क्विंटल कापसाचा उत्पादन खर्च ११,५०० रुपयांवर जातो.

३) दुष्काळामुळे, महापुरामुळे किंवा अवर्षणामुळे होणारी हानी तसेच माकड, डुक्कर व वन्य श्वापदांपासून होणारे नुकसान हिशेबात धरल्यास प्रतिक्विंटल कापसाचा उत्पादनखर्च १३००० रुपयांवर जातो.

वरीलप्रमाणे मी काढलेला कापसाच्या शेतीचा उत्पादन खर्च निर्दोष आहे, असे म्हणता येणार नाही; पण जाणकारांनी यावर चर्चा केल्यास, त्रूटी निदर्शनास आणल्यास यात बरीच सुधारणा करता येईल.

उत्पादन खर्च काढताना मी गृहीत धरलेल्या काही मुद्द्यांचे स्पष्टीकरण असे :

१) एक शेतकरी व एक बैलजोडी १० एकर कापसाची शेती करू शकतो, असे गृहीत धरले आहे.

तक्ता क्र. २

Per Hectare cost of cultovation of kharif crop "Cotton" in Maharashtra for 2011-12 Marketing Season

Sr. No.	Items		Units	Inputs per hectare	Cost per unit of inputs (Rs)		Total cost per hectare (Rs.)
1	Hired Human Labour	Male	Days	19.47	200.00		3,894.00
		Female	Days	92.71	200.00		18,542.00
2	Bullock Labour		Pair Days	19.62	600.00		11,772.00
3	Machinery Charges		Rs	-	-		2,500.00
4	Seed		Kg	1.62	1,518.00		2,459.16
5	Manure		Cartload	10	400.00		4,000.00
6	Fertilizers (In terms of nutrients)	DAP	50 Kg/Bag	3	956.00	2,868.00	
		Urea	50 Kg/Bag	3	281.00	843.00	
		Potash	50 Kg/Bag	1	595.00	595.00	
	Sub Total 6		Rs			4,306.00	4,306.00
7	Irrigation Charges		Rs				-
8	Insecticides		Rs				1,155.43
9	Insurance Charges		Rs				-
10	Incidental Charges		Rs				5,000.00
	Working Capital (Item 1 to 10)		Rs				53,634.59
11	Interest on working capital		Rs				2,896.27
12	Land revenue, cess,& taxes		Rs				39.69
13	Depreciation on implements & farm buildings		Rs				4,000.00
	Cost A1		Rs				60,570.55
	Cost A2 (A1+rent paid for leased in land)		Rs			3,249.27	-
	Cost A2F1 (A2+Family Labour)		Rs				63,819.82
14	Interest on Fixed capital		Rs				770.24
	Cost B1(A1+Interest on fixed capital)		Rs				61,340.79
15	Rental Value of Land		Rs				-
	Cost B2(B1+Rental Value of Land+ rent paid for leased in land)		Rs				61,340.79
16	Family Human Labour	Male	Days	23.12	200.00		4,624.00
		Female	Days	20.04	200.00		4,008.00
	Cost "C1" (B1+Family labour)		Rs				69,972.79
	Cost "C2" (B2+Family labour)		Rs				69,972.79
17	yield per hectare		Qtls				12.00
18	Per Quintal cost C2		Rs/Qtls				5,831.07
	Per Quintal Marketing Charges		Rs/Qtls				133.50
	Per Quintal Transport Charges		Rs/Qtls				150.00
	Cost C2 (Per Quintal)		Rs/Qtls				6,114.57
19	Cost C3 (C2+10% of C2)*		Rs/Qtls				6,726.02
20	Value Of main produce per hectare		Rs				80,712.27
21	Value Of bi-produce per hectare		Rs				-
22	**Per Quintal cost of cultivation**		**Rs**				**6,726.02**

* It is sugested that following additional amt (per Qtls cost) be consider other than price quoted above for the benefit of farmer iterest on working capital (half yearely) 231.70

15% Profit on cost of cultivation 1,008.90

Per quintal minimum cost of cultivation 7,966.63

Note :Marketing Charges are included in cost C2 as recommonded by Alagh Committee & Transport Charges as per market freight rates.

२) सर्व भांडवली खर्च १० वर्षांसाठी गृहीत धरला आहे. व्याज १० टक्के गृहीत धरले आहे.

३) सर्व भांडवली सामुग्रीचे सरासरी आयुष्य १० वर्षे गृहीत धरून त्यावर १० टक्के घसारा गृहीत धरला आहे.

४) शेणखत, नांगरट, बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके, सूक्ष्मखते आणि फवारणी यांच्या मात्रा कृषी विद्यापीठे यांच्या शिफारशींवर आधारित आहेत किंवा त्यापेक्षाही कमी खर्च हिशेबात धरला आहे.

५) शेतमजुरीचा दर २०० रुपये धरलेला आहे.

६) कपाशीच्या दुबारपेरणीचे संकट निर्माण झाल्यास त्यापोटी वाढणारा बियाणाचा खर्च हिशेबात धरलेला नाही.

७) शेतजमिनीची किंमत आणि त्या भांडवली गुंतवणुकीवरील व्याज हिशेबात धरलेले नाही. त्यामुळे वडिलोपार्जित शेतजमीन ज्यांच्याकडे नाही, त्यांनी शेतजमीन खरेदी करून कापसाची शेती करायची म्हटले तर उत्पादन खर्च आणखी वाढेल.

८) वरील उत्पादनखर्चात काटकसर आणि बचत करायचा प्रयत्न केल्यास उत्पादन घटत जाते. तसेच खर्च वाढवायचा प्रयत्न केल्यास उत्पादनात वाढ होण्याची शक्यता बळावत जाते.

९) शेतीमधील खेळत्या भांडवल तुटवड्याचा पहिला मार जमिनीच्या पोत सुधारणीच्या कामावर पडतो. उदा. शेणखताचा खर्च हिशेबात १,२०,०० रुपये धरला आहे. जमिनीचा पोत कायम राहण्यासाठी एकरी १० गाड्या शेणखत घालणे गरजेचे आहे; पण आर्थिक टंचाईमुळे शेणखत किंवा सेंद्रिय खताचा वापर टाळला किंवा कमी केला जातो. त्यामुळे जमिनीचा पोत घसरतो. कालांतराने जमीन नापीक होऊन अपेक्षित उत्पन्न येत नाही. शेणखत किंवा सेंद्रीय खतावरील खर्च टाळल्याने लागवडीचा खर्च कमी होतो; पण उत्पन्नातही घट येते. सेंद्रीय खर्चात बचत केल्याने लागवडीखर्च कमी होतो; पण उत्पन्नातही घट आल्याने उत्पादन खर्च कमी होत नाही.

९) बागायती शेतीत उत्पन्नात वाढ होत असली तरी ओलिताची सुविधा निर्माण करण्यास लागणारी भांडवली गुंतवणूक, ओलितासाठी लागणारा मजुरी खर्च आणि विद्युत/ डिझेलचा खर्च वाढत जातो म्हणून शेवटी जिरायती शेती असो की, बागयती शेती; उत्पादनखर्च सारखाच निघतो.

तोट्याच्या शेतीचे दुष्परिणाम

१) शेतीत येणारी तूट भरून काढताना शेतकऱ्याचे कुपोषण होते, म्हणून शेतकरी शरीराने कृश दिसतो. शेतकऱ्याचे सरासरी आयुष्यमान कमी होते.

२) सुखाचे व सन्मानाचे जीवन जगता येत नाही.

३) मूलभूत गरजा पूर्ण करता येत नाही.

४) ग्रामीण भाग ओसाड आणि भकास होतो.

५) शेतीत येणारी तूट भरून निघत नाही म्हणून शेतकरी वारंवार कर्जबाजारी होतो.

६) कापसाची शेती करताना कधीच भरून निघणार नाही एवढी तूट आली आणि सात जन्मात फेडता येणार नाही एवढ्या कर्जाचा डोंगर उभा राहिला की, शेतकऱ्यात नैराश्य येते.

७) आयुष्य जगण्याचे सर्व मार्ग बंद झाले की, तो मग नाईलाजाने विषाची बाटली किंवा गळफासाशी सोयरीक साधून तुम्हा आम्हा सर्वांना सोडचिठ्ठी देतो.

गंगाधर मुटे
आर्वी छोटी - ४४२३०७,
तह. हिंगणघाट, जि. वर्धा.
gangadharmute@gmail.com
www.baliraja.com, मो. ९७३०५८२००४

■■

कापसाचा सरकारी गुंता

सरकारने कापसाच्या व्यापारातली ढवळाढवळ त्वरित थांबवावी. कापसाच्या व्यापारावरील बंधने काढून कापूस उत्पादकाला मोकळा श्वास घेऊ द्यावा. कापूस सामान्य जनतेसाठी जीवनावश्यक नाही; पण देशातल्या लाखो शेतकऱ्यांचा तारणहार आहे. कापसाच्या शेतीला बरे दिवस आले तरच लाखो शेतकऱ्यांचे जगणे सुसह्य होऊ शकते. देशावर राज्य करणाऱ्या जाणत्या राजांनी-शेतकऱ्यांच्या मुलांनी या वास्तवाची जाण ठेवावी नसता त्यांचे शेतकरी प्रेम बेगडी आहे असेच म्हणावे लागेल.

श्रीकृष्ण उमरीकर

नोव्हेंबरचा महिना जिनिंग कारखान्यांसाठी अत्यंत घाईचा असतो. आलेल्या कापसाचे जिनिंग करून रुईच्या गाठी बनवण्याचे काम जोरात सुरू असते. आवकही जोरात चालू असते. एखाद्या लगीन घरी असते तशीच घाई चालू असते. देशातल्या जिनिंग कारखान्यांत वर्षाला ३-३.५ कोटी गाठी तयार होतात. म्हणजे अंदाजे १५-२० कोटी क्विंटल कापसाचा व्यापार होत असतो. साठ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त मोठा व्यापार होत असतो; पण चालू वर्षी सगळे थंड आहे. नोव्हेंबरच्या मध्यापर्यंत ३०% काम झालेले असते; पण चालू हंगामात कापसाची आवक नसल्यामुळे ५% पेक्षाही कमी गाठी बनलेल्या आहेत. त्यातच पुन्हा कापसाचे भाव पडत आहेत. हे असे कसे झाले? कापसाच्या व्यवहारावर कोणत्या गोष्टींचा परिणाम झाला हे पाहणे आवश्यक आहे. या प्रश्नाचे मूळ गेल्या वर्षी झालेल्या घटनांत आहे. गेल्या वर्षी काय झाले ते आपण प्रथम पाहू.

फेब्रुवारी महिन्यात कापसाला आजवर न मिळालेला विक्रमी भाव मिळाला. एका क्विंटलला ६,७००/- रुपये! कुठे त्या पेक्षाही थोडा जास्त. त्यामुळे कापसाच्या शेतीत कंगाल झालेल्या लाखो शेतकऱ्यांना आशेचा किरण दिसला. कित्येकांनी स्वप्ने रंगवायला सुरुवात केली आणि त्याचमुळे चालू हंगामात कापसाचा पेरा वाढला. ज्याला शक्य आहे त्याने जास्तीत जास्त कापूस लावला. कित्येकांनी अर्थातच कर्जे काढून पेरण्या केल्या.

दुर्दैवाने कोणाही शेतकऱ्याने गेल्या वर्षी भाव का वाढले आणि नंतर ते का पडले याचा पुरेसा अभ्यास केला नसावा अशी शंका येते. गेल्या वर्षी आपले जाणते राजे कृषिमंत्री मा. शरदराव पवार साहेब यांनी मोठ्या उदारपणे ५५ लाख कापसांच्या गाठींच्या निर्यातीस परवानगी दिली; पण सोबत त्यांनी एक अटही घातली. ती म्हणजे ही निर्यात १ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर २०१० च्या पूर्वी पूर्ण झाली पाहिजे. तेव्हा खरे तर आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाचे भाव वाढलेले होते. १०-११ च्या हंगामात कापसाचे भाव १५% ने वाढतील असा अंदाज इंटरनॅशनल कॉटन ॲडवायझरी काउंसीलने जाहीर केला होता. देशातील कापसाचे उत्पादन १५-२०% ने वाढेल याचाही अंदाज केंद्र सरकारला होता. आधी न पाहिलेली तेजी बाजारात होती. तिचा सुगावा लागल्यामुळेच कापसाची निर्यात करणाऱ्या व्यापायांनी दहाच दिवसात ५५ लाख गाठींची निर्यात करण्याची परवानगी मागणारे अर्ज दाखल केले आणि 'कोटा संपला' म्हणून करंट्या कृषिमंत्रालयाने निर्यातीची परवानगी देणे बंद केले. भारतातून मर्यादित कापूस येणार याचा अंदाज जेव्हा आंतरराष्ट्रिय पातळीवरच्या व्यापाऱ्यांना आला तेव्हा मागणी खूप जास्त आणि पुरवठा मर्यादित असल्यामुळे कापसाचे भाव वाढत गेले आणि १५ ऑक्टोबर २०१० पर्यंत ते उच्चांकाला पोहोचले. देशांतर्गत कापसाच्या मागणीमध्ये ८% वाढ होईल असा वस्त्रोद्योग मंत्रालयाचा अंदाज होताच त्यामुळे स्थानिक बाजारपेठेतही कापसाचे भाव तेजीतच राहतील असा अंदाज होता.

केंद्रसरकारने खरे तर कापसाच्या निर्यातीवरील सर्व बंधने उठवून कापसाच्या गाठींच्या निर्यातीला जर प्रोत्साहन दिले असते तर कदाचीत कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचा शेवट व्हायला, त्यांना चांगले दिवस दिसायला सुरुवात झाली असती; पण देशांतर्गत मतांच्या राजकारणात मग्न असलेल्या आणि सत्तेच्या मोहापायी आंधळे झालेल्या राजकारण्यांना आंतरराष्ट्रीय व्यापार कसा दिसणार? महाराष्ट्रातल्या राजकारणाच्या नाड्या जशा 'सहकार महर्षींच्या' हाती असतात तसेच दक्षिणेतल्या खास करून तामीळनाडूचे राजकारण तेथील वस्त्रोद्योजक चालवतात. केंद्रात जर दक्षिणेतल्या एखाद्या पक्षाच्या पाठिंब्याची गरज असेल तर दक्षिणेतल्या वस्त्रोद्योजक मंडळींना खुश ठेवावेच लागते. कदाचीत त्याच कारणाने देशातल्या कापसाला बाहेरच्या बाजारात जास्त भाव मिळत असतानादेखील दक्षिणेतल्या वस्त्रोद्योगाला कच्चा माल स्वस्तात मिळावा म्हणून केंद्रसरकारने कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा बळी दिला आणि कापसाची निर्यात बंधनमुक्त करण्याऐवजी तिला ५५ लाख गाठींच्या निर्यातीचे बंधन घातले. हे काय थोडे होते म्हणून त्यावर पुन्हा ही निर्यात १५ डिसेंबरच्या आत पूर्ण करावी अशी अटही घातली.

भारतातल्या कापसाची निर्यात मुख्यतः मुंबईजवळच्या न्हावा-शेवा बंदरांतून होते. ते बंदर सरकारी आहे. गुजरातमधल्या खाजगी बंदरांतून बोटी रिकाम्या करण्यास किंवा भरण्यास जेवढा वेळ लागतो त्याच्या तिप्पट वेळ न्हावा-शेवा बंदरातल्या बोटींना लागतो. याचे कारण सरकारी कारभार, दुसरे काय? त्यामुळे झाले काय की १५ डिसेंबरपर्यंत कापसाची निर्यात पूर्ण होऊ शकली नाही. मग केंद्राने मुदत वाढवून ती मार्च ३१, २०११ केली; पण त्याचसोबत सुताच्या निर्यातीस तोवर बंदी घातली.

भारतातले सूत बाजारात विक्रीस येत नाही. भारतातून मर्यादित प्रमाणातच कापसाच्या गाठी निर्यात होणार हे स्पष्ट झाले. जगातल्या सुतगिरण्या तसेच कापडाच्या गिरण्यांच्या राखीव साठ्यांत मोठी घट आलेली होती. १९८९-९० नंतर साठा एवढा कमी कधीच झाला नव्हता. त्यातच चीनने कापसाची मोठ्या प्रमाणात आयात सुरू केली. या सर्व बाबींचा परिणाम कापसाच्या भावावर झाला आणि ते ६७०० रु. क्विंटल एवढे वर गेले!

येथवर सगळे कदाचित ठीक होते. खरी शोकांतिका यानंतर सुरू झाली.

कापसाचे वाढत जाणारे भाव पाहून शेतकरी-जिनिंग कारखानदार यांच्या तोंडाला पाणी सुटले. शेतकऱ्यांनी आपला कापूस जवळच ठेवला. जिनिंगवाल्यांनी जमेल तेवढा विकत घेऊन गाठी तयार करून ठेवल्या. सूतगिरणीवाल्यांनी जमेल तेवढे सूत तयार करून ठेवले. मार्च २०११ च्या मध्यावर आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाचा भाव १०,००० रु. प्रतिक्विंटल झाला होता. त्याच सुमारास सर्वच गोष्टी महागल्या होत्या. म्हणून सगळेच मोहात पडले आणि या मोहाचा-लोभाचा व्हायचा तोच परिणाम झाला.

एप्रिलच्या महिन्यात जशी भारतातून सुताची निर्यात सुरू झाली आणी आंतरराष्ट्रीय बाजारातल्या खरेदीदारांना जसा हा अंदाज आला की भारतात कापसाचा-सुताचा खूप साठा आहे, कापसाचे भाव पाडायला सुरुवात झाली आणि एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात ते घसरून ५,००० रु. प्रतिक्विंटल आणि नंतर ४,००० रु. प्रतिक्विंटल एवढे खाली घसरले.

भाव खाली घसरत आहेत हे पाहून आपल्या जवळचा कापूस-गाठी-सूत जे असेल ते विकण्याची सगळ्यांची धडपड सुरू झाली. विकणारे जास्त आणि घेणारे कमी त्यामुळे भाव पडतच गेले आणि ते एप्रिलच्या शेवटी २८००रु. प्रतिक्विंटल एवढे घसरले.



कापसाचा व्यापार पूर्णपणे मुक्त जरी नसला तरी मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय बाजारावर अवलंबून आहे. शेतकऱ्यांनी बाजारभावाची अपेक्षा करताना जगात काय होत आहे याकडे लक्ष ठेवणे आवश्यक आहे. चालू हंगामात राज्य तथा केंद्र सरकारने आपली जबाबदारी झटकून टाकली आहे. बाजारात खरेदीदार कमी आहेत आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील कापसाचे भाव पाहता कापसाला ३३०० ते ३७०० असाच भाव मिळेल असा अंदाज आहे. कापूस व्यापाऱ्यांशी चर्चा केल्यावर ही माहिती मिळाली. आपला कापूस कधी विकायचा हा निर्णय शेतकऱ्यांनी स्वत: घ्यावा. सदर लेखातील माहितीच्या आधारे काही निर्णय घेतल्यास होणाऱ्या नफा-नुकसानीची जबाबदारी सदर शेतकऱ्याची असेल. शेतकरी संघटक, लेखक आणि लेखकाला महिती पुरविणारे कारखानदार यांना जबाबदार धरता कामा नये.

ज्या शेतकऱ्यांनी जास्त भावाचा लोभ ठेवून कापूस जवळ ठेवला होता तो त्यांना कमी भावात विकावा लागला आणि तसेच जिनिंगवाले, सुतगिरणीवाले आणि कापड उद्योजक यांना मोठा तोटा सहन करावा लागला. त्या सर्वांनी जास्त दराने कच्चामाल खरेदी केला होता आणि तयार मालाचे भाव खूप पडले होते. तो धक्का एवढा मोठा होता की त्यातून बहुतांश कारखानदार अजून सावरले नाहीत. त्यामुळे चालू हंगामात फारच थोड्या जिनिंग मिल चालू झाल्या आहेत. सुतगिरण्या आणि कापड गिरण्यांची परिस्थिती काही वेगळी नाही. सुरू झालेल्यांची संख्या कमी आहेच; पण ज्या सुरू आहेत त्यांचे उत्पादनही अंशिक क्षमतेनेच चालू आहे.

गेल्या वर्षी जिनिंग मिल-सुतगिरण्या आणि कापड उद्योजकांना मोठा तोटा सहन करावा लागला. त्यामुळे त्यांचे खेळते भांडवल संपून गेले. या कारणाने कित्येकांनी आपले कारखाने अजून चालूपण केलेले नाहीत. त्यात भर पडली आंतरराष्ट्रीय मंदीची.

जागतिक बाजाराची वाटचाल मंदीच्या दिशेने चालू आहे. अमेरिकेने कर्ज संकटावर तोडगा अजून शोधला नाही. पैसेवाल्यांवर कर वाढवायचा का लोकोपयोगी योजनांना कात्री लावायची हा तिढा सुटत नसल्यामुळे कर्ज संकटाची टांगती तलवार अमेरिकेच्या डोक्यावर आहे.

युरोपाची परिस्थिती अजूनच नाजूक आहे. युरो हे चलन अबाधित रहावे आणि युरोपीय युनियनवर आपली पकड मजबूत राहावी यासाठी जर्मनीच्या पंतप्रधान मॉर्केल बाई हिटलरसारख्याच वागत आहेत. त्यांच्या हट्टीपणाची तुलना काही लोक हिटलरशी करू लागले आहेत. युरोचे काय होईल ते सांगता येत नाही.

चीनने भारताच्या लहरी निर्यात धोरणावर विसंबून न राहता अमेरिकेशी करार करून आपल्या गरजे एवढ्या कापसाची तरतूद करून ठेवली आहे.

वरील कारणांमुळे जागतिक बाजारात कापसाला मुळीच मागणी नाही. म्हणून देशातले बाजारही पडलेले आहेत. सुतगिरण्यांची आर्थिक स्थिती खालावलेली आहे म्हणून त्यांना सध्याच्या भावात कापूस घ्यायला परवडत नाही. तसेच सरकीचा बाजारही थंड आहे.

सरकी किंवा कापसाला खरेदीदार नसल्यामुळे कापसाचे भाव पडत आहेत. सरकार काही करेल या वेड्या आशेवर शेतकऱ्यांनी आपला कापूस विकायला काढलाच नाही. सध्याचे भाव ४,००० रु. प्रतिक्विंटल पेक्षा खाली आले असून ते खालीच जात आहेत. कापसाचे भविष्य अंधारमय आहे. अत्यंत निराशाजनक आहे.

काय चुकले

गेल्या हंगामात कापसाला जास्त भाव मिळू शकत असताना सरकारने निर्यातीवर बंदी घातली. त्याच सोबत सुताच्या निर्यातीसही बंदी घालून कापड उद्योगाचे नुकसान केले.

चालू हंगामात राखीव साठा खुला करून शिल्लक गाठींच्या निर्यातीस तसेच नव्या गाठींच्या निर्यातीस वेळेचे बंधन घातले नसते तर चीनने जो कापूस अमेरिकेकडून विकत घेतला तो जर आपल्याकडून घेतला असता तर गेल्यावर्षीचा शिल्लक गाठी विकून जिनिंग तथा कापड उद्योजकांकडे खेळते भांडवल जमा झाले असते आणि त्यामुळे कापसाचे भाव ४५०० रुपयांपेक्षा जास्त राहिले असते.

उपाय

सरकारने कापसाच्या व्यापारावरील सर्व बंधने तात्काळ हटवावीत. देशातील वस्त्रोद्योग लघु उद्योगांसाठी राखीव ठेवल्यामुळे आपला वस्त्रोद्योग जागतिक बाजारपेठेतल्या स्पर्धेमध्ये टिकू शकत नाही. जगातल्या इतर कापडगिरण्यांनी अत्याधुनिक यंत्रे वापरून आपली कार्यक्षमता आणि नफा खूप वाढवला आहे. आपल्या देशातील लघुउद्योगाच्या आरक्षणामुळे आपल्या देशात कापडनिर्मिती जुन्याच तंत्रज्ञानाने होत असते. तसेच या असल्या पंगू उद्योगाच्या रक्षणासाठी सरकार देशातल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या जिवावर उठले आहे.

सरकारने कापड उद्योगाचे आरक्षण काढून टाकावे नसता कापसाची खरेदी आंतरराष्ट्रीय बाजारभावाने करून तो स्थानिक कापड उद्योगास पुरवावा.

एवढेच नाही तर कापसाच्या बियांचा भावही सरकार निश्चित करते. खताचा पुरवठाही सरकार नियंत्रित करते. ही सारी बंधने उठलीच पाहिजेत. ही ढवळाढवळ संपलीच पाहिजे.

कापूस-कापड उद्योगावरील बंधने काढून जोवर हे सरकार त्यास बंधमुक्त करत नाही तोवर आत्महत्या करणाऱ्या शेतकयांच्या हत्येचे पाप सरकारच्या माथी लागणारच आहे एवढेच नाही तर सरकारने घातलेल्या बंधनांमुळे झालेले नुकसान भरून देणे ही सरकारचीच नैतिक जबाबदारी आहे हे सरकारने विसरू नये आणि म्हणूनच खुल्याबाजारपेठेचे समर्थन करणाऱ्या शेतकरी संघटनेची कापसाला ६००० रुपयांचा भाव देण्याची मागणी योग्यच आहे.

जर सरकारला कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान भरून देता येत नसेल तर सरकारने कापसाच्या व्यापारातली ढवळाढवळ त्वरित थांबवावी. कापसाच्या व्यापारावरील बंधने काढून कापूस उत्पादकाला मोकळा श्वास घेऊ द्यावा. कापूस सामान्य जनतेसाठी जीवनावश्यक नाही; पण देशातल्या लाखो शेतकऱ्यांचा तारणहार आहे. कापसाच्या शेतीला बरे दिवस आले तरच लाखो शेतकऱ्यांचे जगणे सुसह्य होऊ शकते. देशावर राज्य करणाऱ्या जाणत्या राजांनी-शेतकऱ्यांच्या मुलांनी या वास्तवाची जाण ठेवावी नसता त्यांचे शेतकरी प्रेम बेगडी आहे असेच म्हणावे लागेल. सदर लेख लिहिण्यासाठी सेलुचे जिनिंग कारखानदार श्री. निलेश बिनायके यांचे मोलाचे साहाय्य झाले. त्यांनी बरीच मोलाची आकडेवारी पुरविली.

श्रीकृष्ण उमरीकर
नानल पेठ, परभणी-४३१४०१.
मो. ९४२२६४६२८३
umrikar@gmail.com

■■

कापसाचा तिढा : एक होऊन लढा

सरकारच्या सर्वंकश घोरणांचा विचार करून 'शेतकरी तितुका एक' या भावनेने आंदोलनाची उभारणी करावी लागेल. अगामी लोकसभा निवडणूकीपूर्वी भारतातील शेतकरी एकत्र येऊन निर्णायक लढ्यासाठी सिद्ध झाले तरच त्यांची 'शेतकरीविरोधी धोरणाच्या' कचाट्यातून मुक्तता होऊ शकेल, अन्यथा किती वर्षे वाट पाहावी लागेल हे सांगता येत नाही.

अमर हबीब

ऊसाचे आंदोलन यशस्वीरित्या पार पडले व त्यानंतर कापसाचे आंदोलन सुरू झाले, असे वरवर पाहता दिसत असले तरी ते खरे नाही. खरे तर अैंशीच्या दशकात कापूस दराचा प्रश्न पहिल्यांदा ऐरणीवर आला. १९९६ पासून कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरू झाल्या. ऊसाच्या आंदोलनाचा मागमूसही नव्हता तेव्हाही कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आत्महत्या सुरूच होत्या. आत्महत्यांचे सातत्य हा कापूस भागातील अस्वस्थतेचा जळजळीत पुरावा आहे.

१९७१ साली कापसावर राज्य सरकारने एकाधिकार काबिज केला. १९८४ साली कापूस फेडरेशनची स्थापना झाली. कापसावरचा एकाधिकार परवा-परवापर्यंत होता. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढू लागल्यानंतर तो सरकारने स्थगित केला. कापूस एकाधिकार कायद्याचे अनेक दुष्परिणाम झाले. कापूस महाराष्ट्रात पिकायचा खरा परंतु त्यावर प्रक्रिया करणारे कारखाने महाराष्ट्रात राहिले नाहीत. बाजारातून स्पर्धा संपुष्टात आणल्यामुळे सरकारी खरेदी केंद्रांपुढे रांगा लावणे याशिवाय शेतकऱ्याशांना पर्याय राहिला नव्हता. ही पद्धत तब्बल ३०-३५ वर्षे अव्याहत चालली. शेतकऱ्यांना भाव मिळाला नाही. शेतकरी होता त्यापेक्षा अधिक कंगाल झाला. एकाधिकार योजनेतील अधिकारी आणि पुढाऱ्यांचे मात्र उखळ पांढरे झाले. एकाधिकार योजनेने कापुस उत्पादक शेतकऱ्यांचे अक्षरशः कंबरडे मोडले. महाराष्ट्राच्या तुलनेत गुजरातचा विचार केला तर तेथे एकाधिकार नसल्यामुळे कपसाचा व्यापार वाढला. स्थानिक लोकांनी भांडवल गुंतवून प्रक्रिया उद्योग सुरू केले. गुजरातच्या शेतकऱ्यांना केंद्र सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांचाच तेवढा फटका बसला. महाराष्ट्रात मात्र केंद्राचा तर बसलाच शिवाय राज्याच्या एकाधिकार योजनेचाही बसला. महाराष्ट्राचा शेतकऱ्याला दुहेरी फटका बसल्यामुळे तो अगतिक झाला. आज गुजरातमधील शेतकरी आत्महत्या करताना दिसत नाही. महाराष्ट्रात रोज आत्महत्या होत आहेत. ऊसाप्रमाणे कापसावर प्रक्रिया करणारे उद्योग महाराष्ट्रात राहिले असते तर कापसाच्या भावाचे आंदोलन केव्हाच निकाली लागले असते वा ते पेटले असते तर त्यात भल्याभल्यांचा स्वाहा झाला असता.

यंदा भारत सरकारने २८०० रुपये प्रति क्विंटल एवढा कापसाचा भाव जाहिर केला आहे. उत्पादनखर्च ६ हजारपेक्षा अधिक असताना सरकारने एवढा कमी भाव जाहिर करून शेतकऱ्यांच्या दुःखावर डागण्याच दिल्या आहेत. गेल्यावर्षी व त्याच्या अधीच्या वर्षी आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाला चांगला भाव मिळाला होता. परंतु भारत सरकारने निर्यातीवर निर्बंध लादून भारतीय शेतकऱ्यांना त्या लाभांपासून वंचित ठेवले. यावर्षी जागतिक बाजारपेठेतदेखील कापसाचे भाव कोसळत असल्याच्या बातम्या येत आहेत. चीन हा सर्वात मोठा कापूस उत्पादक देश असून तेथे जगातील एकूण कापसापैकी २६ टक्के कापूस पिकतो. चीनने नुकताच अमेरिकेशी करार केला आहे. भारतात जगाच्या २२ टक्के कापूस पिकतो. त्या खालोखाल अमेरिका, पाकिस्तान, ब्राझील, ऑस्ट्रेलिया, उज्बेकिस्तान या देशांचा क्रम लागतो. अमेरिका जगातील सर्वात मोठा कापूस निर्यातदार देश आहे. जगाच्या एकूण कापूस निर्यातीत एकट्या अमेरिकेचा वाटा ४० टक्के आहे. जागतिक बाजारात आपला वाटा तसा कमीच आहे. तो वाढला पाहिजे. परंतु जेव्हा संधी होती तेव्हा सरकारने निर्यात बंदी व निर्यात मर्यादा अडथळे आणले.

फेडरेशन आणि नाफेडमध्ये करार झालेला नाही, त्यामुळे फेडरेशनने खरेदी केंद्रे सुरू केलेली नाहीत. अशा वेळेस सरकारने हा भाव जाहिर केला आहे. ही घोषणा व्यापाऱ्यांच्या पथ्यावर पडली. व्यापारी बाजारात उतरले व ते आता याच भावाच्या आसपास खरेदी करू लागले आहेत. सरकारी भाव हा उत्पादन खर्चाच्या निम्माही नाही. तो सरकारने कसा काढला? ज्यांनी तो काढला त्यांना समजत नव्हते म्हणून चूक झाली असे नाही तर तो जाणिवपूर्वक तसा काढण्यात आला आहे. बियाणे, खते, मजुरी, वाहतूक यांच्या दरात दुपटीहून अधिक वाढ झालेली त्यांना माहित नाही का? 'ज्याला मारता येईल त्याला मरावे' अशी क्रूर निती त्यामागे आहे. शेतकरी आत्महत्या करायला लागले की येऊन पॅकेजही त्यांनीच द्यायचे. आधी पाय तोडायचे व नंतर बैसाखी द्यायची असा हा प्रकार आहे.

१९९० साली भारताने नवे आर्थिक घोरण स्वीकारले. या बावीस वर्षांच्या प्रदीर्घ काळात शेतकऱ्याला या नवीन धोरणाच्या परिघाच्या आत येऊ दिले गेले नाही. खुलीकरण, जागतिकीकरण, या धोरणांपासून लांब ठेवले. नव्या आर्थिक घोरणाचा लाभ मिळू दिला नाही. शेतीशी संबंधित कोणत्याही कायद्यात बदल केलेला नाही. जमिन धारणा कायदा, जमीन अधिगृहण कायदा, जीवनावश्यक वसतूंचा कायदा हे तीनही कायदे शेतकऱ्यांच्या गळ्या भोवती फास झाले आहेत. हे तीनही कायदे घटनेच्या ९ व्या परिशिष्ठात टाकल्यामुळे त्या विरोधात शेतकऱ्यांना न्यायालयातही जाता येत नाही. जोपर्यंत हे तीन कायदे व घटनेचे ९ वे परिशिषठ अस्तित्वात राहील तोपर्यंत शेतकऱ्यांचे दारिद्र्य कमी होणार नाही. कधी ऊसाचा, कापसाचा, सोयाबीनचा तर कधी कांद्यांचा प्रश्न उठेल. तेवढ्यापुरती मलमपट्टी केली जाईल. परंतु कायमचा विलाज होणार नाही.

ऐंशीच्या पूर्वी शेतकऱ्यांचे प्रश्न म्हणजे सिंचन, तंत्रज्ञान, खते व बिबियाणे, मानले जायचे. परंतु अैंशीच्या नंतर मात्र शेती मालाच्या भावाचा प्रश्न शेतकऱ्यांनी महत्त्वाचा मानला. विशेषतः पंजाब, हरयाणा, पश्चिम उत्तर प्रदेश व महाराष्ट्र या चार राज्यातील शेतकरी आंदलक बनले. भारतीय किसान युनियन आणि शेतकरी संघटना यांच्या आंदोलनाचा हा परिणाम आहे. ही आंदोलने भावाचा प्रश्न घेऊन उभी राहतात. ते स्वाभाविक व उचित असले तरी एकेका पिकापुरते ते मर्यादित राहून चालणार नाही. सरकारच्या सर्वंकश घोरणांचा विचार करून 'शेतकरी तितुका एक' या भावनेने आंदोलनाची उभारणी करावी लागेल. अगामी लोकसभा निवडणूकीपूर्वी भारतातील शेतकरी एकत्र येऊन निर्णायक लढ्यासाठी सिद्ध झाले तरच त्यांची 'शेतकरीविरोधी धोरणाच्या' कचाट्यातून मुक्तता होऊ शकेल, अन्यथा किती वर्षे वाट पाहावी लागेल हे सांगता येत नाही.

अमर हबीब
अंबर, हाऊसिंग सोसायटी,
अंबाजोगाई- ४३१५१७ (जि.बीड)
मो. ९४२२९३१९८६

■■

वॉलस्ट्रिट ते लाल किल्ला व्हाया वॉलमार्ट

शेतीच्या बाबतीत एफडीआयचा विचार केला तर, शेतीतील जवळजवळ ४०% नाशवंत माल हा विपणनाच्या अभावी खराब होतो. एका बाजूला देशातील २०% जनतेला एका वेळच्या जेवणावर भागवावे लागत आहे. देश कृषीप्रधान आहे. वारंवार अमेरिका, ऑस्ट्रेलिया, रशिया यांच्याकडून धान्य, दुधाची भूकटी इत्यादी पदार्थांची आयात करावी लागते, ही अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे. रिटेलमध्ये अशा प्रकारे परदेशी गुंतवणुकीमुळे विपणनाची मोठी साखळी तयार होऊ शकते.

ज्ञानेश्वर शेलार

अमेरिकेत आलेली आर्थिक मंदी आणि त्याचे जगभर उमटलेले पडसाद याचा परिणाम अमेरिकेतील वॉलस्ट्रिट येथील शेअर मार्केट, लंडनचे शेअर मार्केट यांसमोर लोकांनी बऱ्याच दिवसांपासून धरणे आंदोलन सुरू केले आहे. यात कम्युनिस्टांचा मोठा वाटा आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या धोरणांमुळेच ही जगभर मंदीची लाट आलेली आहे असे वॉलस्ट्रिटसमोर आंदोलन करणाऱ्या गरिबांचे म्हणणे आहे! भांडवलशाहीला विरोध करण्यासाठी ही माणसे जवळजवळ दोन महिन्यांपासून तेथेच तंबू ठोकून बसली आहेत.

इकडे संसदेत मल्टिब्रॅण्ड रिटेलमध्ये (किरकोळ व्यापार) ५०% व सिंगल ब्रॅण्ड रिटेलमध्ये १००% प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक (एफडीआय) करण्यास परदेशी कंपन्यांना परवानगी देण्यावरून हिवाळी अधिवेशनात मांडल्या गेलेल्या बिलास सर्वपक्षांचा आणि संघटनांचा जोरदार विरोध होत आहे. जयललिता, मायावती, ममता यांच्यासह मुख्यविरोधी पक्ष भाजप आणि सरकारमधील सहकारी डावे पक्ष यांनी तीव्र विरोध सुरू केला आहे. उमा भारतींनी तर परदेशी कंपन्यांना पाय ठेवू देणार नाही, मॉल्स सुरू करू देणार नाही, अशी दुकाने उघडण्याचा प्रयत्न झाल्यास मी स्वत: असे दुकान जाळून टाकीन अशी धमकीच दिली आहे. भरीत भर म्हणून अण्णा हजारेंनीही छोट्या व्यापाऱ्यांचे व दुकानदारांचे 'हित' लक्षात घेऊन एफडीआयला विरोध केला आहे.

देशभर एक कोटी २० लाखांहून अधिक किराणा दुकाने आहेत. फेरीवाले छोटे भाजीवाले आणि त्यांना पुरवठा करणारे छोटे उद्योग अशी आपली छोट्या छोट्या व्यावसायिकांची मोठी संख्या देशात आहे. या सर्वांच्या रोजगारावर एफडीआयमुळे परिणाम होईल (?) हा विरोधकांचा मुद्दा आहे. संसद ६ दिवसांपासून ठप्प झालेली आहे. सरकार सर्व विरोधकांच्या बैठकांवर बैठका घेऊन हा प्रश्न त्यांच्या गळी उतरवण्याच्या व त्यांचे सहकार्य मिळविण्याच्या प्रयत्नात आहे. मनमोहन सिंग वारंवार छोट्या दुकानदारांवर व व्यापाऱ्यांवर कुठलाही परिणाम होणार नसल्याची ग्वाही संसदेत आणि बाहेर देत आहेत. तरीही कोणीही विरोधक माघार घ्यायला तयार नाही. संसदेचे काम बंद पडलेले आहे.

रिटेलमध्ये अशाप्रकारे खरोखरच गुंतवणूक झाली तर छोट्या व्यापाऱ्यांवर परिणाम होईल का? हा प्रश्न सर्व बाजूंनी तपासून पाहणे आवश्यक आहे. या अगोदरही रिलायन्सने अशाप्रकारचे मॉल उघडले होते. त्यातील किमान ५० ठिकाणचे मॉल तरी त्यांना बंद करावे लागले. बिग बाजारला मात्र ते ग्राहकांना रास्त किमतीत चांगल्या मालाचा पुरवठा करत असल्याने उत्तम प्रतिसाद मिळत आहे. शेवटी ग्राहक त्यांच्या खिशाला काय परवडते याचा विचार करूनच मॉल जायचे की छोट्या दुकानातून खरेदी करायचे हे ठरवणार आहेत. वेगवेगळ्या आर्थिक स्तरातील लोकांना एकाच वेळी वेगवेगळ्या ठिकाणांहून देशी आणि परदेशी वाणाच्या सर्व वस्तू उपलब्ध झाल्यास खरे तर ग्राहकांना अधिक स्वातंत्र्य मिळेल.

या रिटेलमध्ये १० लाख लोकसंख्येच्या वरील लोकसंख्या असलेल्या महानगरांमध्येच परवानगी मिळणार आहे. अशी महानगरे देशामध्ये ५३ आहेत. इतर संपूर्ण छोटी शहरे आणि ग्रामीण भाग हा छोट्या व्यापाऱ्यांना तसाच शिल्लक राहणार आहे. छोट्या खरेदीसाठी लोक काही ऊठसूट मॉलमध्ये जाणार नाहीत. त्यासाठी गल्लीबोळातील छोटी दुकाने, ठेले, टपऱ्या, हातगाड्या यांवरूनच खरेदी केली जाईल. एफडीआयचा फारसा परिणाम छोट्या ग्राहकांवर आणि विक्रेत्यांवरही होणे शक्य नाही. जो विरोध होत आहे तो केवळ राजकीय हेतूने होत आहे, हे उघड आहे. संसदेमध्येही एकटे मनमोहन सिंग आणि प्रणव मुखर्जी हेच दोघे या निर्णयाची बाजू लावून धरीत आहेत. सोनिया गांधींनी यावर मौन पाळलेले आहे. युवराज सध्या निवडणूक प्रचारामध्ये गुंतलेले आहेत. काँग्रेसने आपल्या सर्व खासदारांना आणि कार्यकर्त्यांना एफडीआय येऊ देणे ही जर पक्षाची भूमिका असेल तर जनसामान्यांत जाऊन त्यांना एफडीआयचे फायदे तोटे समजावून सांगणे आवश्यक आहे. अशा प्रकारची चर्चा एफडीआयच्याच नव्हे तर कोणत्याच बाबतीत आपापल्या मतदार संघात लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते, पक्षांचे पदाधिकारी करताना कधीही दिसत नाहीत.

आपल्या पक्षाची भूमिका काय आहे? किंवा होणारे हे निर्णय हे जनतेच्या किती फायद्याचे आहेत किंवा तोट्याचे आहेत, अशी अभ्यासू चर्चा संसदेत किंवा संसदेबाहेर झडावी, असे सहसा होत नाही! मीडियामध्ये या चर्चा घडत असली तरी पक्षांमध्ये अशी चर्चा घडत नाही.

शरद जोशींनी तर 'स्टार माझा'वाहिनीवर दि. २९ नोव्हें. रोजी त्यांना 'संसदेत या विषयावर विरोधी पक्षांनी चर्चा घडवून आणावी, संसद बंद पाडू नये, यावर आपले काय मत आहे?' असे विचारले असता- 'संसदेत सध्या चर्चा घडतात कुठे? संसद हे मारामारीचा आणि भांडणाचा आखाडा झाला आहे. अभ्यासपूर्ण चर्चा तेथे अभावानेच घडतात. एकतर संसद बंद पाडली जाते किंवा पक्षापक्षांमध्ये जी हुकूमशाही सुरू झाली आहे, त्या हुकूमशाहीबरहुकूम पक्षांचे खासदार माना डोलावतात. विरोधी किंवा बाजूने मत मांडतात; पण बोलत मात्र काहीच नाहीत. म्हणून संसदेत सध्या चर्चा घडत नाही, असे सांगितले.

'आपले एफडीआयविषयी काय मत आहे? एफडीआयला परवानगी द्यावी की नाही?' असे विचारले असता त्यांनी, 'हा निर्णय जवळजवळ बारा वर्षे उशिरा होत आहे. १९९१ मध्ये उदारीकरणाचा सुरुवात झाली तेव्हाच हा निर्णय व्हायला हवा होता.' असे सांगितले.

शेतीच्या बाबतीत एफडीआयचा विचार केला तर, शेतीतील जवळजवळ ४०% नाशवंत माल हा विपणनाच्या अभावी खराब होतो. एका बाजूला देशातील २०% जनतेला एका वेळच्या जेवणावर भागवावे लागत आहे. देश कृषीप्रधान आहे. वारंवार अमेरिका, ऑस्ट्रेलिया, रशिया यांच्याकडून धान्य, दुधाची भूकटी इत्यादी पदार्थांची आयात करावी लागते, ही अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे. रिटेलमध्ये अशा प्रकारे परदेशी गुंतवणुकीमुळे विपणनाची मोठी साखळी तयार होऊ शकते. वाया जाणाऱ्या नाशवंत मालावरती प्रक्रिया करता येणे शक्य होईल. सध्या शेतीमध्ये भांडवलाचा अभाव आणि शेतीत भांडवल येऊ नये, यासाठी सरकारचा चाललेला खटाटोप पाहता एफडीआय हा शेतीमालाच्या विपणनातील भांडवल गुंतवणुकीचा उत्तम मार्ग आहे. शेतातून निघालेला शेतीमाल ग्राहकाच्या हाती पडेपर्यंत त्याला वेगवेगळ्या दलालांच्या साखळीतून जावे लागते. एफडीआयला विरोध करणाऱ्यांमध्ये या साखळीचा मोठा हात आहे. नेहमीसारखेच यातून छोट्या शेतकऱ्यांचेही भले होणार आहे का? त्यांचा त्यातून काय फायदा होणार आहे? असा प्रश्न उपस्थित केला जातो! सध्या भारतातील शेतकरी हा जगातील एकमेव असा उत्पादक आहे की, ज्याच्या मालाचा भाव तो स्वत: ठरवू शकत नाही आणि मालाचा लिलाव केला जातो, अशाप्रकारे मॉल जर उभे राहिले तर, शेतकऱ्यांना

पान ११ पाहा

अण्णांच्या देऊळात अराजकाची पूजा

स्त्रीचा विनयभंग करण्यात आंबट शौकिनांना जो विकृत आनंद मिळतो तशा प्रकाराचा आनंद उतू जाणारी अथक चर्चा शरद पवार हल्लाप्रकरणी 'मैं अण्णा हूं' टोपीवाले उन्मत्तपणे करताना पाहिले की, अण्णा आंदोलनाने देशाला अराजकाच्या उंबरठ्यावर आणि अविवेकाच्या घसरणीवर आणून उभे केल्याची प्रचिती येते. अर्थात सगळा दोष अण्णा आणि त्यांच्या आंदोलनावर थोपवून मोकळे होणे हे वस्तुस्थितीकडे पाठ फिरवून वाळूत तोंड खुपसून बरसणाऱ्या शहामृगासारखे होईल.

सुधाकर जाधव

शरद पवार यांचेवरील हल्ल्यानंतर दुसरे ज्येष्ठ नेते प्रणव मुखर्जी यांनी अतिशय हताशेने आणि व्यथित होऊन म्हटले होते की, माहीत नाही हा देश कोठे चालला आहे? देशात सध्या जे वातावरण आहे ते लक्षात घेता प्रणव मुखर्जी यांची प्रतिक्रिया समर्पक आणि सर्वांनाच अंतर्मुख करायला लावणारी होती. शरद पवार यांच्यावरील हल्ला हा त्यांनी केलेल्या वैयक्तिक चुकांचा परिणाम आणि परिपाक नव्हता. शरद पवारांच्या राजकीय शैलीबद्दल आणि राजकारण करण्याच्या पद्धतीबद्दल अनेकांचे मतभेद आहेत आणि वेळोवेळी ते प्रकटही झाले आहेत. त्यांच्या विश्वसनीयतेवर सतत प्रश्नचिन्ह उपस्थित होत राहतात; पण तरीही संयमी, वादग्रस्त नसलेला, टोकाची भूमिका न घेताही पुरोगामी प्रतिमा टिकवून ठेवलेला नेता म्हणून त्यांची ओळख आहे. या प्रसंगी सर्व राजकीय पक्ष आणि नेते एक दिलाने त्यांच्या पाठीमागे उभे राहिले ते याचमुळे. हल्ल्यानंतरच्या त्यांच्या प्रतिक्रियेतून त्यांची प्रगल्भता व परिपक्वता दिसून आली आहे. राजकीय परिपक्वतेतूनच त्यांनी या हल्ल्याला फारसे महत्त्व दिले नाही व इतरांनीही देऊ नये असे आवाहन केले; पण झालेला हल्ला हा शरद पवार नावाच्या व्यक्तीवर नव्हता. शरद पवार ज्या सरकारचे व व्यवस्थेचे प्रतिनिधित्व करतात त्या सरकार व व्यवस्थेबद्दलची चीड त्यातून व्यक्त झाली आहे. देशात वाढत चाललेल्या राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील धगधगत्या असंतोषाची ती विकृत अभिव्यक्ती होती. देशातील राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात आलेली विकृती दूर करण्याची ती एक फक्त वैयक्तिक विकृत अभिव्यक्ती असती तर फारशी चिंता करण्याचे कारण नव्हते आणि पवार म्हणतात तसे त्या घटनेकडे दुर्लक्ष करता आले असते. समाजात मनोविकृतांची आणि माथेफिरूंची कधीच कमी नसते. अशा माथेफिरूंच्या कृत्याला गंभीरपणे घ्यायची गरज नसते; पण शरद पवार यांच्यावर हल्ला झाल्यानंतर ज्या अस्वाभाविक प्रतिक्रिया मोठ्या प्रमाणात समोर आल्यात आणि येत आहेत त्या झालेल्या हल्ल्यापेक्षा भयंकर आणि गंभीर आहेत. चिंता आणि चिंतन करायला लावणाऱ्या आहेत. प्रणवबाबूंनी दिलेली प्रतिक्रिया उद्वेगातून आली होती; पण नंतर येत असलेल्या प्रतिक्रिया खरोखरच देश कोणत्या वळणावर उभा आहे आणि कोठे चालला आहे याबद्दलचा प्रश्न उपस्थित करणाऱ्या आहेत. प्रतिक्रियांची तीव्रता लक्षात घेता या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणे घातक ठरणार आहे.

अण्णांचे देऊळ

या हल्लाप्रकरणी सर्वात विवादास्पद प्रतिक्रिया राहिली ती अण्णा हजारे यांची. त्यांची 'एकच थापड मारली?' ही पहिली उत्स्फूर्त प्रतिक्रिया ऐकून अनेकांना प्रचंड धक्का बसला. अर्थात धक्का बसण्याचे प्रमाण महाराष्ट्राबाहेर अधिक होते. महाराष्ट्रातील राजकीय सामाजिक वर्तुळातील लोक अण्णांना बऱ्यापैकी जाणून असल्याने त्यांची प्रतिक्रिया त्यांना धक्का देऊन गेली नाही. गेल्या २० वर्षांपासून अण्णा हजारे महाराष्ट्रात सार्वजनिक जीवनात आहेत. त्यांच्या कार्याबद्दल द्यायला हवा तेवढा मान महाराष्ट्राने त्यांना दिला आहे. लोकांपेक्षाही सत्ताधाऱ्यांनी आणि राजकीय नेत्यांनी तर जास्तच मान दिला आणि त्यांच्याकडून आपल्या राजकीय विरोधकांचे काटेही काढलेत. अगदी गेल्या एप्रिल महिन्यातील जंतरमंतर आंदोलनाच्या तीन महिने आधी त्यांचा महाराष्ट्र दौरा झाला होता त्याला प्रतिसाद त्यांच्या कार्यकर्त्यांचाच होता. आज गांधीवादी म्हणून ते सर्वदूर ओळखले जात असले तरी उपोषण करण्याव्यतिरिक्त त्यांच्यात व गांधीत कधीच कोणते साम्य राहिले नाही. चांगल्या कामासाठी अतिरेकी मार्गाचा वापर ही बाब महाराष्ट्राला नवीन नव्हती. काँग्रेस जितकी गांधीवादी तितकेच अण्णादेखील गांधीवादी हे माहीत असतानाही महाराष्ट्रातील गांधीवादी कार्यकर्त्यांनी अण्णांची मदतच घेतली. दारू पिणाऱ्यांना फटक्याची शिक्षा देणाऱ्या अण्णांची महाराष्ट्रात धान्यापासून दारू निर्मितीचे कारखाने उघडू नयेत यासाठी गांधीनिष्ठ कार्यकर्त्यांनी अण्णांचा उपयोग करून घेतला होता... अण्णांच्या समाजसेवी वृत्तीबद्दल व कार्याबद्दल महाराष्ट्रात सर्वसाधारणपणे आदर असला तरी महाराष्ट्राने त्यांना कधीच डोक्यावर घेतले नव्हते. त्यांच्या कामाच्या आणि विचाराच्या मर्यादा महाराष्ट्राला चांगल्याच ठाऊक होत्या. म्हणूनच शरद पवार हल्लाप्रकरणी अण्णांच्या प्रतिक्रियेने महाराष्ट्राला धक्का बसला नाही. उलट नंतर लोकशाहीवर हल्ला वगैरे अशी जी अधिकृत प्रतिक्रिया त्यांनी प्रसार माध्यामांसमोर व्यक्त केली तीच महाराष्ट्रातील लोकांना बेगडी वाटली. अण्णांचे अंतरंग महाराष्ट्राला ठाऊक असले तरी महाराष्ट्रा बाहेर अण्णांची वेगळी प्रतिमा निर्माण झाली असल्याने त्यांना मात्र अण्णाचे हे 'विश्वरूप दर्शन' पाहून भोवळ आली. कारण सामान्य, सध्या भोळ्या कार्यकर्त्याला देवदूताच्याच नाही तर प्रत्यक्ष देव स्वरूपात पाहण्याचा हा परिपाक होता. अण्णांना तसे रूप देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्नच झाला. ज्यांनी 'देऊळ' हा मराठी चित्रपट बघितला असेल आणि मनोरंजनाच्या पलीकडे जावून समजून घेतला असेल त्यांना भारतीय राजकारणाच्या पटलावर अचानक आणि झपाट्याने उभ्या राहिलेल्या अण्णांच्या देवळाचा अर्थ आणि मितार्थ लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. अण्णाला देवत्व देण्याचा हा महत्वाकांक्षी प्रकल्प अशा पद्धतीने उभा राहिला की, अण्णाला स्वतःच आपण अवतार असल्याचे भासले आणि तसे त्यांनी रामलीला मैदानावर लाखो लोकांसमोर जाहीरसुद्धा करून टाकले होते! ज्या देऊळात अण्णा स्वेच्छेने व आनंदाने देव म्हणून बसले त्याचा प्रेरक व कल्पनाकार अद्यापही गुलदस्त्यात असला तरी या देऊळाचे रचनाकार केजरीवाल आणि बेदीकंपनी होती, काळा पैसा निर्माण करून थकलेल्या आमीर खान, अनुपम खेर, ओम पुरीसारख्यांनी पतपुरवठा केला आणि प्रसार माध्यमांतील दबंगांनी याची रंगरंगोटी करून आकर्षक जाहिरात करून गर्दी खेचली हे आता जगजाहीर झाले आहे; पण दगडाला शेंदूर फासला म्हणजे दगड देव बनत नाही किंवा दगडाला देवत्व प्राप्त होत नसते हे शरद पवार हल्लाप्रकरणीच्या अण्णांच्या प्रतिक्रियेतून पुन्हा एकदा सिद्ध झाले; पण अण्णांसारखीच प्रतिक्रिया सर्वच 'मै अण्णा हूं' टोपीवाल्यांचीच नाही तर या आंदोलनाला बढावा व उत्तेजना देऊन उत्तेजित करणाऱ्या मीडियामधील व बाहेरच्या विद्वानांचीदेखील आहे. वास्तविक अण्णा आंदोलनाने निर्माण केलेल्या उन्मादातून आणि राजकीय पक्ष व नेते वाईट असल्याने त्यांना 'सरळ' केल्याने प्रश्न सुटेल अशा सडकछाप विचारांवर आधारित आंदोलनाची परिणती यापेक्षा वेगळी होऊ शकत नाही हे अण्णांच्या लक्षात आणून देण्याऐवजी शरद पवार यांचेवरील हल्ल्याचा संबंध महागाई व शेतकरी आत्महत्या या परस्पर विरोधी

गोष्टींशी जोडून व त्याच्या आठवणीने गळा काढून आपल्या बौद्धिक दिवाळखोरीचे आणि अविवेकी विचाराचे प्रदर्शन केले आहे. स्त्रीचा विनयभंग करण्यात आंबट शौकिनांना जो विकृत आनंद मिळतो तशा प्रकाराचा आनंद उतू जाणारी अथक चर्चा शरद पवार हल्लाप्रकरणी 'मै अण्णा हुं' टोपीवाले उन्मत्तपणे करताना पाहिले की, अण्णा आंदोलनाने देशाला अराजकाच्या उंबरठ्यावर आणि अविवेकाच्या घसरणीवर आणून उभे केल्याची प्रचिती येते. अर्थात सगळा दोष अण्णा आणि त्यांच्या आंदोलनावर थोपवून मोकळे होणे हे वस्तुस्थितीकडे पाठ फिरवून वाळूत तोंड खुपसून बसणाऱ्या शहामृगासारखे होईल.

अण्णांना संधी देणारे दोषी

अण्णा हजारे यांच्यासाठी आमच्या राजकारण्यांनी, समाजधुरीणांनी आणि अर्थवेत्यांनी जमीन तयार करून ठेवली हे जळजळीत सत्य आहे. या जमिनीत भ्रष्टाचाराचे सर्व प्रकारचे खत टाकून ठेवण्यात आले होते. या जमिनीला पाणी देण्यासाठी विषमतेचे धरण आणि बेरोजगारांचे पाटही बांधून तयार होते. राज्यकर्त्यांनी सामान्य जनतेच्या मानेवर जू ठेवून जमिनीची मशागतही करून ठेवली होती. काही दशकांपूर्वी अशाच जमिनीत जर्मनीमध्ये नाझीचे पीक फोफावले होते. अराजकाचे पीक फोफावण्यासाठी आदर्श अशी ही जमीन सरकारने अण्णांनी जंतर मंतरचे आंदोलन मागे घ्यावे म्हणून त्यांना लाचेत देवून टाकली. राळेगणमध्ये गेल्या दोन तपापासून ठोकशाहीचा जो यशस्वी प्रयोग अण्णांनी राबविला, तो प्रयोग देश पातळीवर राबविण्यासाठी आवश्यक ती संधी व रसद या जमिनीने पुरविली हे नाकारता येणार नाही. अण्णांनीही त्यांच्या राळेगणच्या ठोकशाही बियाण्यावर दिल्लीच्या समाजसेवी संस्थांच्या संस्थानिकांच्या प्रयोगशाळेत संकर करून देशाच्या भिन्न वातावरणात रुजू शकेल असे जन लोकपाल नामक संकरीत बियाणे तयार केले आणि आयत्या तयार जमिनीत पेरून टाकले! जंतरमंतरहून रामलीला मैदानात येईपर्यंत बंपर पीक अण्णांच्या हाती आले. रामलीला मैदान याच पिकाच्या स्फोटकाच्या राशीने व्यापून गेले होते. पवारांवर हल्ला करणारा हरविंदर या राशीचा एक कणमात्र आहे.

अराजकाची उपासना थांबवा

आज सारा देश अशा स्फोटकाच्या राशीवर जीव मुठीत धरून उभा आहे. हा स्फोट झाला तर अविवेकाच्या लोळात पहिला बळी देशाच्या लोकशाहीचा व संविधानाचा जाईल. अण्णांच्या अनुयायांना या स्फोटकांना बत्ती देण्याची घाई झाली आहे. भ्याड सरकार आधीच अगतिक होऊन खंदकात लपून बसले आहे आणि इतर पक्ष व त्यांचे नेते हे सरकार संभाव्य स्फोटापासून जनतेचे रक्षण करण्यास असमर्थ आहे हे सिद्ध करण्यासाठी आतूर बनले आहे. जनता दोन पात्याच्या नाही तर तीन पात्याच्या कात्रीत सापडली आहे. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये यासाठी आता लोकांनाच पुढाकार घ्यावा लागणार आहे. सर्व सामान्य जनतेजवळ या सर्वांना पाणी पाजता येईल असे मताचे अमोघ अस्त्र आहे. त्याचा संधी मिळताच वापर करता यावा म्हणून ते पारजून ठेवले पाहिजे; पण हे अमोघ अस्त्र फक्त लोकशाही व्यवस्थेतच वापरता येते याचा विसर पडू देता कामा नये. 'मै अण्णा हुं' टोपीवाल्यांनी या अस्त्राकडे नेहमीच तुच्छतेने पाहिले आहे. त्याचा उपयोग न करताच अडगळीत टाकून दिले आहे. त्यांना लोकशाही मार्गाचे नाही तर नाझीमार्गाचे अप्रूप व आकर्षण आहे. हल्लेखोर हरविंदरसिंह त्यांचा आदर्श व गळ्यातला ताईत त्याचमुळे बनला आहे. ज्या सर्व सामान्य सज्जनांनी अण्णा आंदोलनाचे भाबडेपणाने समर्थन केले त्यांचे डोळे या घटनेने उघडले नसतील तर त्यांच्यातील सज्जनपणा अण्णा आंदोलनाने संपवून टाकला असेच मानावे लागेल. असे झाले तर ती त्यांची व्यक्तिगत हानीच नाही तर देशाचीही मोठी हानी ठरेल. अण्णांच्या देऊळात अराजकाची चाललेली उपासना थांबविण्यात तेच महत्वाची भूमिका बजावू शकतात. सरकार तर असून नसल्यासारखे आहे.

सुधाकर जाधव
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

पान ९ वरून पुढे

आपण जो माल उत्तमप्रकारे पिकवू शकतो तो या मोठ्या दुकानांना पुरविता येईल, अशा पुरवठादारांची वेगवेगळ्या पिकवणाऱ्यांची मॉलवाल्यांना अत्यंत आवश्यकता आहे. एफडीआयला परवागनी देतानाच खासगी स्थानिक छोट्या उत्पादकांकडून त्यांनी ३०% माल उचलावा अशी अट घालण्यात आली आहे. मॉलमध्ये लागणाऱ्या विविध वस्तू व शेती उत्पादन हे काही मॉलमालक स्वत: तयार करणार नाहीत. हजारो प्रकारच्या वस्तू अशा मॉल्समधून ठेवल्या जातात. त्या सर्व छोट्या-मोठ्या उत्पादकांकडूनच घेतल्या जातात. शेतकऱ्यांना आपला माल प्रत्यक्ष मॉल्सना विक्री करण्याची संधी मिळणार आहे. दलालांची साखळी त्यामुळे तुटेल. सध्या भारतीय शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गुंतवणूक होणे, विपणन व्यवस्था उभी राहणे, दलालांची साखळी तोडणे, लिलाव पद्धत बंद होऊन करारमदार करून आपल्याला आपला माल कोणत्या भावाने विकला पाहिजे हे ठरविण्याची संधी मिळणे अत्यंत आवश्यक आहे. मॉल्समुळे या सर्व गोष्टी उशिरा का होईना घडणार आहेत.

छोटे व्यापारी आणि दुकानदार यांच्यावर गदा येईल. अशी जी भीती व्यक्त केली जात आहे, ती केवळ त्यांना घाबरवून टाकण्यासाठी आहे. आजही आपण पुण्यात लक्ष्मी रोडवर कपड्यांच्या मोठमोठ्या दुकानांसमोर आणि कंपन्यांच्या शोरूमसमोर छोटे हातगाडीवाले आपल्या गाड्या लावून रेडीमेड कपड्यांची विक्री करताना दिसतात. त्यांना ग्राहकही मोठ्या प्रमाणात मिळतात. मुंबई, सुरत, अहमदाबाद, दिल्ली - कोणत्याही शहरातील चित्र यापेक्षा वेगळे नाही. कोणताही दुकानदार माझ्या कपड्याच्या दुकानासमोर तुझी हातगाडी लावू नको असे म्हणत नाही. दोघांचाही धंदा जोमाने चालू आहे. परदेशी दुचाक्या आणि चारचाक्या भारतात आल्यानंतर त्यांनी आपल्या शोरूम्समध्येच सर्व्हिसिंग सेंटर्स सुरू केले; परंतु गॅरेजवाल्यांचा धंदा त्यामुळे बंद पडला, असे झालेले नाही. उत्तम मॅकेनिक तर अशाच शोरूममधून चांगल्या वेतनावर कामही करीत आहेत. शिक्षण क्षेत्रामध्ये एकाचवेळी जिल्हा परिषदेच्या शाळा आणि खासगी शाळाही शहराशहरांमध्ये चालू आहेत. ज्यांना जेथे शिक्षण घेणे शक्य आहे. तेथे ते उपलब्ध होत आहे. उलट राजकीय पक्षांचे कार्यकर्तेच अशा शैक्षणिक कार्यामध्ये आपला हात धुवून घेत आहेत. अनुदानित, बिगर अनुदानित, कायम विनाअनुदानित, इंग्रजी माध्यमांच्या, मराठी माध्यमांच्या अशा सर्व प्रकारच्या शाळा गल्लीगल्लीत सुरू झाल्या आहेत. आता त्याने काय शिक्षणाची हेळसांड सुरू होते आहे की शिक्षण मिळत आहे, याचा विचार करावा लागेल! लोकांना आपल्या परिसरात उत्तम शाळा उपलब्ध होत आहेत. परदेशी विमान कंपन्यांना केव्हाच भारतामध्ये उड्डाण करण्याची परवानगी मिळालेली आहे. दूरसंचार क्षेत्रामधील सर्व मोबाईल हॅण्डसेट कंपन्या आणि दळणवळण सेवा देणाऱ्या कंपन्यांना भारतीय कंपन्यांबरोबरच परदेशी कंपन्यांनाही परवानगी आहे. उलट लोक परदेशी कंपन्यांचे हॅण्डसेट आणि परदेशी कंपन्यांचीच सेवा अधिक पसंत करतात. आपण दररोज वापरणाऱ्या बहुतेक वस्तुंमध्ये टुथपेस्टपासून ते मोटारींपर्यंत सर्वच क्षेत्रांमध्ये परदेशी कंपन्यांना वाव आहे आणि त्यात चुकीचे काहीही नाही. ज्याला जे जे काही चांगले करून विकता येईल त्याने ते ते जगाच्या पाठीवर कोठेही विकावे आणि जगात जे जे काही उत्तम असेल ते सर्वांना उपलब्ध व्हावे हीच तर उदारीकरणाची आणि जागतिकीकरणाची साधी सरळ व्याख्या आहे. जगात जी काही उलाढाल होते ती लोकांसाठी अर्थात ग्राहकांसाठी आहे. अशा अर्थाने अर्थशास्त्राचा विचार केल्यास जगात फक्त दोनच जाती आहेत- एक उत्पादक आणि एक ग्राहक! सर्व सरकारे आणि राजकारणीमात्र या दोघांची भेट होऊ नये असेच प्रयत्न करताना दिसतात. सरकार हेसुद्धा शेवटी माणसांसाठीच आहे. ते काही राजकारण्यांना राजकारण खेळण्यासाठी देशाच्या सरकारांना शेजारच्या देशांशी कुरापती आणि भांडणे काढून लढाया आणि युद्ध करण्यासाठी नाही. जेव्हा जेव्हा अशा प्रकारची काही वाईट परिस्थिती निर्माण होईल, तेव्हा त्याचे नियंत्रण करणे आणि कोणी काही वाईट हेतूने उपद्व्याप करीत असेल तर नियम आणि कायदे असावेत, हे खरे आहे; पण हे सर्व उत्पादक आणि ग्राहकांची भेट घडवण्यासाठी चाललेला खटाटोप आहे, हे विसरून चालणार नाही.

ज्ञानेश्वर शेलार
मो. ९२२६७९७०१८ ■■

वह सुबह अब तो आयेगी!

रामदेव बाबा यांच्या हरिद्वार येथील आश्रमात देशभरातल्या शेतकऱ्यांच्या संपन्न झालेल्या बैठकीचा वृत्तांत

मोठं आंदोलन छेडण्यासाठी बाबाजींना ग्रामीण भारतातून प्रचंड पाठिंबा आवश्यक आहे आणि त्यासाठी शेतकऱ्यांना भावणारे मुद्दे घेऊनंच पुढे जावं लागेल हे त्यांनी हेरलं. त्या मुद्याच्या शोधासाठी हे संमेलन असावं, ज्यातून कश्मीर ते कन्याकुमारी आणि पुरी ते कच्छ सर्व शेतकऱ्यांना छळणारा मुद्दा शोधता येईल. कर्ज मुक्तीच्या रूपानं सर्वच शेतकऱ्यांना केवळ छळणाराच नव्हे तर आता पावेतो अडीच लाखावर शेतकऱ्यांना आत्महत्या करायला लावणारा हा मुद्दा त्यांना आंदालनासाठी योग्य वाटला.

अनंत उमरीकर

महाराष्ट्रातील शेतकरी संघटना एका नवीन वळणावर उभी आहे, एका विशाल आंदोलनाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. ज्या कर्जमुक्तीच्या क्षणाची शेतकरी केव्हापासून वाट पाहत आहेत तो क्षण आता जवळ आला आहे. याची साक्ष म्हणजे शरद जोशी आणि योग गुरू बाबा रामदेव या दोघांचं जाहिररित्या एका मंचावर येणं! हे घडलं कसं?

काही महिन्यापूर्वी औरंगाबाद येथे झालेल्या शेतकरी संघटनेच्या एका बैठकीत संघटना अध्यक्ष रवी देवांग आणि उमरीकर वकील यांनी बाबा रामदेव यांचे बरोबर हात मिळवणी करावी या कल्पनेचा सूत्रपात केला. या विषयावर अनुकूल प्रतिकूल खूप चर्चा झाली. हे जमणं कठीण होतं. वैचारिकदृष्ट्या शेतकरी संघटना व्यक्ती स्वातंत्र्य, तंत्रज्ञान स्वातंत्र्य, निवडीचं स्वातंत्र्य आणि खुली अर्थव्यवस्था मानणार तर भारतीय किसान संघटना आणि बाबांची भारत स्वाभिमान संघटना या सर्वांविरुद्ध. शिवाय त्यांचा स्वदेशी आणि जैविक शेतीवर पराकोटीचा आग्रह. तेव्हा या दोन टोकावरील संघटना एकत्र याव्या कशा? खरी अडचण तर हीच होती. अशा परिस्थितीत काय भूमिका घ्यावी हाच प्रश्न अनेक कार्यकर्त्यां पुढे पडला होता.

सुदैवानं बाबांच्या संघटनेचा जाहीरनामा आम्ही चाळला तेव्हा लक्षात आलं की, किमान दोन मुद्यावर दोनही संघटना समान भूमिका घेऊ शकतात. शेती मालाला योग्य भाव आणि देशाची आर्थिक उन्नती. तेव्हा या दोन मुद्यावर भर द्यावा आणि इतर मुद्दे बाजूला सारावे आपली मांडणी करताना विरोधाच्या मुद्यावर टिका टिपणी न करता आपली बाजू ठळकपणे मांडावी आणि शक्य तो समन्वय साधावा असं धोरण ठरवलं. प्रश्न होता, आपल्याला रामदेव बाबापर्यंत पोहोंचता येईल कसं हाच!

योग जुळून यायचे असले म्हणजे कसे येतात बघा. संघटनेचे माजी अध्यक्ष राम नेवले यांना त्याच वेळेस ही कल्पना पटली. हा एक परत सुयोग की, बाबाजींच्या भारत स्वाभिमान या संघटनेच्या महाराष्ट्रातील एक कार्यकर्त्या सुश्री ज्योती गर्ग आणि राम नेवले यांची चांगली ओळख होती. तेही याच विचारात होते. त्यांनी ज्योती गर्गशी संपर्क केला आणि एकत्र बैठकीची कल्पना मांडली. त्यांनीही विचार केला असावा, शेतकरी संघटनेचा विचार ऐकून घ्यायला काय हरकत आहे? त्यांनी होकार भरला आणि नागपूरला एक बैठक व्हावी असं ठरलं. या बैठकीसाठी पन्नास एक कार्यकर्ते त्यांच्या संघटनेचे आणि शेतकरी संघटनेचे सहासात प्रमुख कार्यकर्ते एकत्र आले. संघटनेच्या लोकांनी शेतकी संघटनेची भूमिका ठळकपणे मांडली आणि सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरेही दिली. ते सारं प्रतिपादन भारत स्वाभिमानच्या कार्यकर्त्यांना भावलं. स्वतः ज्योती गर्ग यांना हा विचार आधीक आकर्षक वाटला. त्यांनी रामदेव बाबांशी संपर्क केला आणि त्यातून हे ठरलं की, शेतकरी संघटनेच्या काही प्रमुख कार्यकर्त्यांनी रामदेव बाबांची त्यांच्या आश्रमात भेट घ्यावी आणि त्यांच्यापुढे आपली भूमिका मांडावी. ठरल्याप्रमाणे राम नेवले, रवी देवांग, वामनराव चटप, सरोजताई आदींच्या नेतृत्वाखाली एक प्रतिनिधी मंडळ हरिद्वारला रवाना झाला. या सर्व प्रसंगी रामभाऊ नेवले हे मध्यस्ताची भूमिका पार पाडीत होते. रामदेव बाबा सोबतच्या चर्चेत शेतकरी संघटनेच्या विचारातील सच्चेपणा बाबांना भावला आणि असं ठरलं की, देशभरातल्या सर्व शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींचा एक कार्यकर्ता मेळावा हरिद्वार येथे बाबांच्या आश्रमात आयोजित करण्यात यावा. याही बैठकीसाठी मध्यस्ताची भूमिका राम नेवले यांनीच पार पाडायची होती. त्याप्रमाणे देशभरातल्या अनेक शेतकरी संघटनांना आमंत्रणं गेली. त्या त्या संघटनांनी आपापल्या प्रतिनिधींची नावं आणि पत्ते कळवले. बाबांच्या पतंजलि योगाश्रमात सुरक्षा व्यवस्था खूपंच कडक असल्यामुळे नाव, पत्ता आधी कळवणं आवश्यक होतं.

या बैठकीसाठी स्वतः शरद जोशींनी हजर रहावं ही तर सर्वांची आग्रही मागणी होती. तेव्हा लोकांच्या मागणीपुढे मान झुकवून प्रकृती अस्वस्थ असूनही ते या कार्यक्रमास आवर्जून हजर राहिले. स्वतः रामदेव बाबा आणि शरद जोशी दोनही दिवस जातीने कार्यक्रमाची सांगता होईपर्यंत हजर राहिले. यावरून या बैठकीचं महत्त्व लक्षात यावं. बैठकीला, हरयाणा, पंजाब, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, गुजरात, आंध्र प्रदेश, केरळ, कर्नाटक, बिहार आणि अर्थातंच महाराष्ट्राचे प्रतिनिधी हजर होते. सर्वाधिक म्हणजे सदतीस प्रतिनिधी महाराष्ट्रातून होते. त्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर मध्यप्रदेश. त्यांच्या आठ-दहा प्रतिनिधी सह आणि त्यानंतर इतर राज्यातून चार, दोन अशाच संख्येनं लोक होते.

बाबाजींचा पंतजली योगाश्रम अत्यंत देखणा. विस्तीर्ण आवार, वातावरण नितांत प्रसन्न. सारा परिसर हिरवाईन नटलेला, स्वच्छ, नीटनेटका. जिकडे तीकडे झाड झुडूप शिस्तीत उभे, शाळेतल्या पोरांनी रांगा लावाव्या तसे. चार चार मजली प्रचंड मोठ्या इमारती. एका एका इमारतीत शेसव्वाशे खोल्या. सर्व खोल्यात एसी पंचतारांकित हॉटेल सारख्या. सर्व खोल्यात ॲटच्ड बाथ, टॉयलेट. चोवीस तास गरम, थंड पाणी. प्रत्येक खोलीत दोघांची सोय केलेली. खाली वर जाण्यासाठी चोवीस तास लिफ्ट आणि अर्थात वीज-प्रत्येक खोलीत टीव्ही. या कार्यक्रमासाठी आलेल्या सर्व प्रतिनिधीची व्यवस्था सात नंबरच्या 'वसिष्ट' नावाच्या इमारतीत करण्यात आली होती. इथे सर्व इमारतींना ऋषींची नावं दिलेली. प्रचंड आकाराच्या भोजन गृहाचं नाव 'प्रसादालयान' जेवण घ्यायचं ते प्रसाद समजून!

बहुतेक प्रतिनिधी २१ तारखेला रात्री जमा झाले आणि बावीसच्या सकाळपर्यंत येतंच राहिले. कुणाला काही अडचण भासलीच तर त्यासाठी रामभाऊ हजर होतेच.

बावीस तारखेला दुपारी तीन वाजता बैठक सुरू होणार होती. सकाळी सर्व प्रतिनिधींसाठी आश्रमाच्या 'फूड पार्क'च्या भेटीचा कार्यक्रम होता. हे फूड पार्क म्हणजे वनस्पती आणि फळापासून ज्यूस, मुरब्बे, जेली, लोशन आदी तयार करण्याचे प्रचंड कारखाने होते. तिथेच धान्याच्या पिठाच्या गिरण्या होत्या. त्या ठिकाणी आयुर्वेदिय पद्धतीने धान्याचे मिश्रण करून पीठ बनवण्यात येई. चार प्रचंड इमारतीत हे फूड पार्क होता. सारा परिसर १७४ एकरांचा होता. बाबाजींनी प्रचंड काम उभं केलेलं आहे. ते सारं वैभव आम्ही डोळ्यात भरून घेतलं. तिथून निघून आम्ही लोक बाबांच्या औषधी बनवण्याच्या कारखान्यात पोहोंचलो. हा कारखाना मात्र ऐन गावातंच, हरिद्वारलाच आहे. शुद्ध आयुर्वेदिक पद्धतीन तयार केलेली औषधी या ठिकाणी तयार होतात. या सर्वच कारखान्यातून स्वच्छतेची आणि संसर्ग बचावाची विशेष काळजी

घेतल्या जाई.

बावीस तारखेला सकाळीच या पाहणी मोहिमेवर रवाना होण्याआधी महाराष्ट्रातील काही प्रमुख कार्यकर्ते रवी देवांग यांच्या खोलीवर जमा झाले. त्यात वामनराव, सरोजताई, गुणवंत पाटील, उमरीकर वकील, शैलाताई, कडूअप्पा आदींचा समावेश होता. रामभाऊ अर्थातंच हजर होते. रामभाऊ तर जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी असायचेच. या खोलीवर संघटना कार्यकर्त्यांचं ब्रेन स्टॉर्मींग सेशन झालं. सभेच्या कार्यक्रम पत्रिकेची जबाबदारी ही रामभाऊवरंच होती. बाबाजींशी चर्चा करूनंच त्यांनी पत्रिका बनवली होती. महाराष्ट्रातील शेतकरी संघटना सर्व राज्यात सर्वांत मोठी आणि याही बैठकीसाठी सर्वाधिक संख्येनं कार्यकर्ते याच संघटनेचे. शिवाय या बैठकीची मूळ कल्पनाही महाराष्ट्राचीच. साहजिकंच चर्चेमध्ये विषयाची मुख्यमांडणी करायचं काम याच लोकांवर येणार होतं.

रामभाऊंनी विषय पत्रिका समोर ठेवली तेव्हा त्या त्या विषयावर कुणी कुणी भाषणं करावं हे सर्वांनी मिळून सुचवलं. सर्वच संघटनांच्या प्रतिनिधींना विषय मांडण्याची संधी देणं शक्यच नव्हतं. वेळ थोडा होता. तेव्हा एकानं बीज भाषण करावं आणि त्यानंतर प्रेक्षकांनी त्याबाबत काही शंका असल्यास प्रश्न विचारावे असं ठरलं. रामभाऊंनी विषय पत्रिका वाचून दाखवली. तेव्हा विषय आणि वक्ते या प्रमाणे ठरले.

एक : शेती मालाला रास्त भाव आणि उत्पादन खर्च या विषयावर गुणवंत पाटील.

दोन : तंत्रज्ञान आणि जीएमसीड- डॉ. मानवेंद्र कातोळे.

तीन : जैवीक शेती-भारत स्वाभिमानतर्फे डॉ. रुपेल, डॉ. संगीता आणखी एक जण.

चार : घटनेचे नववे परिशिष्ट रवी देवांग.

पाच : भू-संपादन कायदा-वामनराव चटप.

सहा : शेतकरी संघटना आणि स्त्रीयांचे प्रश्न-सरोजताई काशीकर.

सात : कर्जमुक्ती-अनंत उमरीकर.

बावीस तारखेला दुपारी चारच्या सुमारास श्री. शरद जोशी, एक पत्रकार देवेंद्र शर्मा आणि रामदेव बाबांचे प्रतिनिधी आचार्य बालकृष्ण यांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन करून या कार्यक्रमाची सुरुवात झाली. रामदेव बाबा हे एका पत्रकार परिषदेत व्यग्र असल्यामुळे या कार्यक्रमाला यायला त्यांना उशीर होता. देवेंद्र शर्मा यांनी उद्घाटनाच्या भाषणात जैवीक शेतीचं आग्रही प्रतिपादन केलं आणि उर्वरक, औषधीमुळे शंतीचं आणि पर्यायानं देशाचं कसं नुकसान होत आहे हा 'एनजीओ'चा राग आळवला आणि वादग्रस्त मुद्याला हात घातला.

प्रत्यक्ष चर्चेला सुरुवात केली ती गुणवंत पाटील यांनी. शेत मालाच्या भावाचा प्रश्न एका सुव्यवस्थीत डेमोद्वारे मांडला. त्या मागोमाग डॉ. मानवेंद्र काचोळे, डॉ. रुपेल, डॉ. संगीता यांनी या कार्यक्रमात ग्राफिक्सचे डेमो देत आपापल्या विषयाची मांडणी केली. डॉ. रुपेल, डॉ. संगीता ही मंडळी बाबांची शिष्य मंडळी आणि जैवीक शेतीची आग्रह प्रतिपादक. त्यांनी तासातासाचा वेळी घेऊन आपापली बाजू मांडली. यापैकी कुणीही हातात नांगर धरलेला नव्हता तर प्रयोग शाळेत बसून केलेल्या प्रयोगाच्या आणि एनजीओंच्या आर्थिक पाठिंब्यावर जैविक शेतीचा पाठपुरावा केला असावा हे जाणवत होतं. मुख्य वक्त्यांचं प्रतिपादन संपलं की, प्रेक्षकांना प्रश्न विचारण्याची संधी दिली जायची आणि अशा प्रकारे प्रेक्षक आणि प्रतिपादक यांच्यात सुसंवाद साधल्या जाई. बाबा रामदेव आणि शरद जोशी हे वेळोवेळी आपापली मतं प्रदर्शित करत आणि कार्यक्रम संबंधीत विषयाभोवतीच फिरत राहिल याची काळजी घेत.

कार्यक्रमाचे संचालन करणाऱ्या माणसानं एक काळजी घेतली होती, की जैवीक शेती, स्वदेशी, बंदिस्त व्यवस्था आदी विचारधारेला अनुकूल व्यक्तिंना आधीक वेळ कसा मिळेल याची काळजी घेतली. मात्र शेतकरी संघटनेच्या वक्त्यांना दहा, पंधरा मिनिटांच्या बंधनात अडकून टाकलं. मात्र या बंधनात राहूनही तासा तासाच्या भाषणानं जे जैवीकवाल्यांना साधता आलं नाही ते शेतकरी संघटनेच्या वक्त्यांनी आपल्या मर्यादीत वेळेतल्या प्रतिपादनानं साधलं.

भारतीय किसान संघ ही संघ प्रणित किसान संघटना. त्यांच्या कार्यकर्त्यांनी वेळ मिळेल तेव्हा पारंपरिक पद्धतीने म्हणजे भारताची महानता, संस्कृती, इतिहास आणि म्हणून जैवीक शेती, स्वदेशी, बंदव्यवस्था यातील अनेक कालबाह्य कल्पनांनी भरलेली पुरजोश भाषण दिली. ज्यातून न आंदोलनाची दिशा स्पष्ट होत होती न प्रश्नांची उकल. भारतीय किसान संघाचे राष्ट्रिय अध्यक्ष यांच प्रतिपादन तर विचित्र होतं. शेतकऱ्याला रास्तभाव मिळावा आणि ग्राहकाला स्वस्त माल मिळावा आणि यासाठी मधली 'दलालांची' साखळी उडवून लावावी हे त्यांचं म्हणणं; पण त्याला पर्याय काय याचं उत्तर त्यांच्याकडे नव्हतं. त्याला पर्याय म्हणून एफडीआयचं बिल येतंय तर त्यालाही यांचा विरोध! हा विरोधाभास बाबाजींच्याही लक्षात आला. वेळोवेळी शरद जोशी बाबाजींना याबाबत सांगतंच असत.

या बैठकीचा मूळ उद्देश असा होता की, शेतकऱ्यांचा असा कोणता मुद्दा आहे की, ज्यावर भारतभरातला शेतकरी आंदोलनात उतरू शकेल. नेमकं या मुद्यावर जैवीकवाल्याकडे काही उत्तर नव्हतं. बाबाजी अशाच मुद्याच्या शोधात होते आणि नेमकं या मुद्यावर शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी बोट ठेवलं. सारी भाषण शांततेनं ऐकणाऱ्या शरद जोशींना मात्र त्यांच्या शिष्यांच्या कामाबद्दल पूर्ण विश्वास होता. खरं सांगायचं म्हणजे गेल्या तीसावर वर्षांपासून त्यांनी ज्या तत्वाचा पुरस्कार केला होता त्याच्या सच्चेपणावर त्यांचा विश्वास होता आणि तो विश्वास कार्यकर्त्यांनी सार्थ केला.

एकूण चर्चावेळी आवर्जून सतत उपस्थित राहिलेल्या रामदेव बाबांना मात्र जाणवलं की, जैवीकवाल्यांचे मुद्दे आंदोलनासाठी तग धरू शकत नव्हते आणि पूरक तर नव्हतेच. जैवीकवाल्यांनी मांडलेले काही मुद्दे तर भाबडे होते. त्यांच्या एका वक्त्यानं केलेल्या जैवीक शेतीच्या प्रयोगाबद्दल सांगितलं की, शेताच्या एका तुकड्यात त्यानं धान्य पेरलं, ज्याला काही वरखत दिलं नाही. मात्र दुसऱ्या तुकड्याला वरखत दिलं. पीक आलं तेव्हा लक्षात आलं की, बिन खताच्या तुकड्यात जास्त धान्य आलं, खतवाल्या तुकड्यापेक्षा! असल्या प्रतिपादनावर तर कुणीही विश्वास ठेवू शकणार नाही!

शेतकरी संघटनेला जैवीक शेतीला विरोध करायचा नव्हता. त्यांचं म्हणणं एवढंच की, कशी शेती करायची याची निवड करायचा अधिकार आणि स्वातंत्र्य त्या त्या शेतकऱ्याचं आहे. ज्याला वाटेल त्यांनी उर्वरकांचा वापर करावा. म्हणून जीएमसीडला कायद्यानं बंदी घालता येणार नाही. या बैठकीत वाद घालायचा नव्हता तर आपापली बाजू केवळ मांडायची होती आणि ते काम मात्र शेतकरी संघटनेच्या प्रतिनिधींनी चोख बजावलं. त्यामुळे जैवीकवाल्यांचं आक्रस्ताळ प्रतिपादन आपोआपंच फिकटलं.

दोन दिवस चाललेली ही चर्चा शरद जोशी आणि रामदेव बाबा यांनी सर्वकाळ उपस्थित राहून अत्यंत शांततेनं ऐकली. दोघेही आवश्यक त्यावेळी आपलं मत प्रकट करत असत. सुरुवातीलाच शरद जोशी यांनी रामदेव बाबांना सुचवलं की, शेतकरी आंदोलनाचं नेतृत्व आता त्यांनी स्विकारावं आणि बाबाजीनी नम्रपणानं या सूचनेचा स्विकार करत सभेची सूत्र आपल्या हाती घेतली. बाबाजींनी वादग्रस्त ठरू शकणारे मुद्दे कटाक्षाने टाळत सभेचं कामकाज वादविवादात रुपांतरीत होणार नाही याची काळजी घेतली.

सर्व वक्त्यांची प्रतिपादन ऐकल्यावर ते या निष्कर्शाला आले की, भारतीय किसान संघ आणि जैवीक वाले हे एका टोकावर तर भारतातील सर्वांत अधिक संख्या असलेली शेतकरी संघटना ही दुसऱ्या टोकावर. तेव्हा आपल्या समारोपाच्या भाषणात ते म्हणाले, ''दोन फळ्या स्पष्ट दिसतात आणि दोघेही दोन ध्रुवावर आहेत असं जावणतं. यातून मार्ग काढायचा झाला तर ज्या मुद्यावर वाद आहेत ते मुद्दे सध्या बाजूला सारून कर्जमुक्ती, रास्तभाव आणि कर्जनीती या मुद्यावरंच काही आंदोलन आपण करूया. हे मुद्दे सार्वत्रिक अपील असलेले आहेत आणि यावर एकमतही आहे.''

रामदेव बाबा हे अत्यंत तरल बुद्धिचे आणि व्यवहारचतूर, हजरजबाबी, प्रसन्न व्यक्तिमत्व असलेले. त्यांच्या हालचाली चपळ आणि वय त्यांच्या बाजूने. एवढा प्रचंड पसारा उभा करणारा दुसरा कुणी संन्यासी असेल असं वाटत नाही. एकाचवेळी मंचावर शेतकऱ्यासाठी आयुष्य वेचणारे वयोवृद्ध, तपोवृद्ध शरद जोशी आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नाला समजू पाहणारे उदयीमान नेते बाबा रामदेव यांना पाहून शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लागण्याच्या आशा पल्लवित झाल्या. रामदेव बाबा शरद जोशीशी अत्यंत नम्रतेने आणि प्रेमाने संवाद साधत. शरद जोशींच्या पायाला वेदना होत होत्या तेव्हा बाबाजींनी त्यांच्या पायाला स्पर्श करून ॲक्यूप्रेशरचं तंत्र जोशींचे सहाय्यक अनंत

देशपांडे यांना समजावून दिलं. शेवटी बाबाजींनी जाहीर केलं की, या पुढील शेतकरी आंदोलन कर्जमुक्ती, रास्तभाव आणि कर्जनीती या मुद्यावरंच होईल. या आंदोलनाचं स्वरूप काय, कसं, केव्हा, कुठे व्हावं यासाठी लवकरंच एक बैठक घेऊन निर्णय घेण्यासाठी मोजक्या प्रमुख लोकांची एक समिती त्याच दिवशी तयार करण्यात आली.

या संमेलनात शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी फार महत्वाची कामगिरी बजावली. त्यांनीच मांडलेल्या कर्जमुक्ती आणि रास्तभाव याच मुद्यावर सर्वच प्रतिनिधी आणि स्वतः रामदेव बाबाही प्रभावित झाले. कर्जमुक्तीचा मुद्दा लक्षपूर्वक ऐकून ते उद्‌गारले, ''हे असं काही होत असेल ही तर आश्चर्याची बाब आहे. रिझर्व बँकेच्या आदेशाची पायमल्ली करत बँकांनी शेतकऱ्यांची लूट करावी हे तर महा आश्चर्य आहे!'' सरोजताईंनी स्त्रीयांच्या प्रश्नावर शेतकरी संघटनेनं केलेल्या कामाचा आढावा अत्यंत प्रभावीपणानं मांडला. त्याचं प्रतिपादन ऐकून सारं सभागृह प्रभावित झालं. रवी बाबूंनी शरद जोशी आणि रामदेव बाबा या दोघांचं एकत्र येणं कसं नैसर्गिक आहे हा मुद्दा अत्यंत खुबीनं मांडला. साऱ्या प्रयत्नात सर्वांत अधिक महत्त्वाची कामगिरी कुणी बजावली असेल तर शालिन व्यक्तिमत्व असलेल्या राम नेवले यांनी. सुरुवातीपासूनंच त्यांनी रामदेव बाबासोबत एकत्र काम करता येईल का याची चाचपणी चालवली. आधी ज्योती गर्गशी भेट, त्यापुढे त्यांच्या मार्फत रामदेव बाबांशी संपर्क आणि प्राथमिक चर्चा, शेवटी राष्ट्रीय किसान संमेलनाची आखणी, कार्यक्रम पत्रिका तयार करणे आणि संघटनेच्या वक्त्यांची निवड या साऱ्या टप्यावर रामभाऊंची भूमिका महत्त्वाची राहिली. यापुढील आंदोलनात ही मध्यस्ताची जबाबदारीही त्यांच्यावरंच येईल असं दिसतं. त्यांचं अस्तित्व कोअर ग्रुप मधील 'दोन ध्रुवां'मध्ये पुलाचं काम करेल असा विश्वास आहे.

एकूणच परिस्थितीचं आकलन केलं असता मोठं आंदोलन छेडण्यासाठी बाबाजींना ग्रामीण भारतातून प्रचंड पाठिंबा आवश्यक आहे आणि त्यासाठी शेतकऱ्यांना भावणारे मुद्दे घेऊनंच पुढे जावं लागेल हे त्यांनी हेरलं. त्या मुद्याच्या शोधासाठी हे संमेलन असावं, ज्यातून कश्मीर ते कन्याकुमारी आणि पुरी ते कच्छ सर्व शेतकऱ्यांना छळणारा मुद्दा शोधता येईल. कर्ज मुक्तीच्या रूपानं सर्वच शेतकऱ्यांना केवळ छळणाराच नव्हे तर आता पावेतो अडीच लाखावर शेतकऱ्यांना आत्महत्या करायला लावणारा हा मुद्दा त्यांना आंदालनासाठी योग्य वाटला. या मुद्याला कुणाचाही विरोध असण्याचं काही कारण नाही हेही बाबाजींच्या लक्षात आलं तेव्हा येऊ घातलेल्या किसान आंदोलनाच्या केंद्रस्थानी कर्जमुक्ती हाच मुद्दा असेल हे स्पष्टच आहे. हे आंदोलन अधिक व्यापक, सखोल व्हावं यासाठी भारतभर दौरे करण्याची बाबाजींची तयारी असावी असंही जाणवलं. शेतकऱ्यांना आणखी काही काळ दम धरावा लागणार आहे.

दोन दिवसाच्या चर्चेअंती असं दिसतं की, रात्रीचा गर्द अंधार फाडून कर्जमुक्तीची पहाट येऊ पाहते आहे. शरद जोशींच्या शब्दात ''शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचं माझं आयुष्यभराचं स्वप्न पूर्ण होत आहे असं दिसत आहे!''

■■

शेतकरी संघटना वृत्त

शेतकरी संघटनेच्या वतीने 'शेतकऱ्यांची समांतर विधानसभा'

१० आणि ११ डिसेंबरला नागपूरात

मागील तीन दशकांहून अधिक काळ शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी लढा देत असलेल्या शेतकरी संघटनेने ऊस, धान, कापूस, कर्जमुक्ती, लक्ष्मीमुक्ती, शेतमालाचे आयात-निर्यात धोरण, कांद्याचा प्रश्न आदी समस्यांच्या सोडवणुकीसाठी कंबर कसली आहे. आंदोलने, रास्ता रोको, धरणे, निदर्शने यांसारख्या लोकशाही मार्गांच्या आंदोलनाने शासनावर काहीच परिणाम झाला नाही म्हणून आता संघटनेने १० आणि ११ डिसेंबरला 'शेतकऱ्यांची समांतर विधानसभा' नागपुरात रामनगर मैदान, रामनगर येथे आयोजित केली आहे. ही माहिती माजी आमदार वामनराव चटप यांनी आज पत्रपरिषदेत दिली.

चटप यांनी सांगितले की, जागतिक बाजारपेठेत मागील वर्षी कापसाला चांगला भाव असतानासुद्धा शासनाने प्रथम ५५ लाख व नंतर १० लाख गाठी एवढ्या मर्यादित प्रमाणातच निर्यातीला परवानगी दिली. त्यावेळी शेतकऱ्यांना ६ ते ७ हजार रुपये भाव मिळाला होता व नंतर एकदम ३ हजारांवर आला. सुरुवातीलाच निर्यात खुली राहिली असती तर शेतकऱ्यांना ७ हजार रुपये भाव मिळाला असता. यावर्षी जागतिक बाजारपेठेत मंदी आहे व शासनाने अजूनपर्यंत निर्यात खुली केलेली नाही. महाराष्ट्र शासनानेसुद्धा कापसाला ३३०० रुपये एवढाच भाव जाहीर केला आहे. दुसरीकडे बाजारपेठेत चांगले भाव असतील तेव्हा निर्यातबंदी व कमी असेल तेव्हा शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून देण्याचे केंद्राचे धोरण. अशा दुहेरी मारामुळे शेतकरी अडचणीत येत आहेत.

शेतकऱ्यांची समांतर विधानसभेच्या दोन दिवसांच्या कामकाजात बिगर बासमती तांदूळ व डाळीवरील निर्यातबंदी उठविणे, कापसाला प्रती क्विंटल ६ हजार रुपये, धानाला २६०० रुपये, सोयाबीनला ३ हजार, तर तुरीला ५ हजार रुपये एवढी किंमत द्यावी, संपूर्ण शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती, वीज बिलातून मुक्ती, पूर्णदाबाची व पूर्ण वेळ वीज देण्यात यावी या विषयांसह शेतकऱ्यांच्या अन्य जिव्हाळ्याच्या प्रश्नांवरही चर्चा करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधीसुद्धा विधानसभा किंवा लोकसभेत पाहिजे त्या पोटतिडकीने आवाज उठवित नाही. त्यामुळेच आपले प्रश्न आपणच सोडविले पाहिजे, या विचारानेच या अभिनव आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला. दोन दिवसांत विविध विषयांवरील चर्चेसोबतच ठरावांसह पुढील आंदोलनाची रूपरेषा ठरविण्यात येणार आहे. कापूस, धान, तूर, सोयाबीन व अन्य पीक उत्पादक शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांच्या समांतर विधानसभेला उपस्थित राहावे, असे आवाहनही वामनराव चटप यांनी केले.

पत्रपरिषदेला सरोजताई काशीकर, राम नेवले, अरुण केदार, गंगाधर मुटे, मधुसूदन हरणे, घनश्याम पुरोहित, उमेश निनावे उपस्थित होते.

वीजजोडणी साठी संघटनेचे औरंगाबादेत आंदोलन

मुख्यमंत्र्यांच्या पुतळ्याचे दहन

महावितरणने सुरू केलेल्या थकबाकी वसूलीच्या मोहिमेत कृषीपंपांचा वीज पुरवठा खंडीत केला जात आहे. हा वीजपुरवठा तात्काळ जोडण्यात यावा या मागणीसाठी शेतकरी संघटनेने गुरुवार (दि. २४) दुपारी २ वाजता औरंगाबाद कार्यकारी अभियंता कार्यालयासमोर आंदोलन केले. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांचा पुतळा जाळण्यात आला. यावेळी शेतकरी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष कैलास तवार यांनी मुख्यमंत्री खोटारडे आहेत, असा आरोप केला. आघाडी सरकार एकीकडे शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळाला पाहिजे, पुरेशी वीज देऊ अशी घोषणा करते; मात्र प्रत्यक्षात अंमलबजावणी करीत नाही. शेतकरी देशोधडीला लागण्याची वेळ आली आहे. काही राज्यांत शेतकऱ्यांना फुकट वीज दिली जाते. मग महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना का मिळत नाही? असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला. जिल्ह्यातील ज्या थकबाकीदार शेतकऱ्यांची वीज कनेक्शन तोडले आहे, ते तात्काळ जोडावे हंगामाच्या शेवटी जेव्हा पीके निघतील तेव्हा शेतकरी महावितरणची थकबाकी भरेल, अशी प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिली. आंदोलनप्रसंगी पुरुषोत्तम लाहोटी, भाऊसाहेब गायके, मदन डक, साईनाथ चोथे, ज्ञानेश्वर गायके, विठ्ठल गायके, दिगंबर राजगुरू, आदिंसह शेकडो शेतकऱ्यांचा सहभाग होता.

कापूसप्रश्नी मुख्यमंत्र्यांशी चर्चा फिस्कटली

कापूसप्रश्नी सर्वपक्षीय बैठकीत शेतकरी संघटनेचा सरकारवर हल्लाबोल

कापसाच्या वाढीव हमीभावाच्या मुद्यावरून पेटलेल्या राज्यव्यापी आंदोलनामुळे कोंडीत सापडलेल्या राज्यसरकारने यातून मार्ग काढण्यासाठी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण मुंबईतील सह्याद्री अतिथिगृहावर सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीला सरकारच्यावतिने मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचेसह उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील, कृषीपणन मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, रोजगार हमी मंत्री डॉ. नितीन राऊत, सामाजिक न्यायमंत्री शिवाजीराव मोघे, पर्यावरण मंत्री संजय देवतळे, वित्तराज्यमंत्री राजेंद्र मुळक, विधानसभा उपाध्यक्ष वसंतराव पुरके, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मधुकरराव पिचड उपस्थित होते.

कापूस उत्पादक आंदोलनकर्त्यांच्या वतिने शेतकरी संघटनेतर्फे कैलास तवार व गंगाधर मुटे, प्रहार संघटनेचे बच्चू कडू, आमदार रवी राणा, समग्र विकास आघाडीचे प्रकाश पोहरे उपस्थित होते.

शेतकरी संघटनेचे कैलास तवार म्हणाले की, एकीकडे कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष अशोक गुल्हाटी कबूल करतात की, महाराष्ट्रात कापसाचा उत्पादन खर्च वाढला आहे आणि दुसरीकडे मात्र कापसाचा उत्पादन खर्च वाढूनही कापसाला भाव द्यायला चालढकल करते. केंद्र सरकारने हातमाग उद्योगाला मदत केली, उद्या कापड उद्योगाला करेल; पण नेमके कापूस उत्पादकांकडेच का दुर्लक्ष केले जाते? मुळाला चांगले पाणी न देता चांगल्या फळाची अपेक्षा कशी करता? माझा स्वतःचा दहा हेक्टर कापूस आहे, आतापर्यंत खर्च झाला आहे एक लक्ष अंशी हजार रुपये आणि उत्पादन येईल बारा क्विंटल. आजच्या बाजारभावाप्रमाणे किंमत येईल पन्नास हजार रुपये. मग मी एक लक्ष वीस हजार रुपयाचा तोटा कसा भरून काढायचा? मी कापूस पिकवला यात काय गुन्हा केला? आम्ही पूर्वीपासून उत्पादन खर्चावर आधारीत रास्त भावाची मागणी केली आहे. कापसाला सहा हजार, सोयाबीनला तीन हजार, धानाला एक हजार सहाशे आणि तुरीला पाच हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळालाच पाहिजे, अशी तवार यांनी जोरदार मागणी केली.

शेतकरी संघटनेचे गंगाधर मुटे म्हणाले की, कापसाचे उत्पादन घेण्यासाठी लागणाऱ्या निविष्ठांचे भाव दीडदुपटीने वाढले आहेत. मजुरीचे दर, शेतीऔजार बनविण्यासाठी लागणारा लाकुडफाटा, दोरेदोरखंड, वखरफास यांचेही भाव वाढले आहेत मात्र गेल्यावर्षी सात हजार रुपये प्रतिक्विंटल असणारे भाव यावर्षी चार हजार रुपयावर घसरले आहेत. शेतमालाचा उत्पादनखर्च काढण्याची पद्धत सदोष असल्याने आणि शेतमालाला रास्त भाव देण्यासाठी लागणारी इच्छाशक्ती सरकारकडे नसल्यानेच कापूस उत्पादकांची ससेहोलपट होत असून त्यांना नाईलाजाने आत्महत्या कराव्या लागत आहे. कापसाला यंदा सहा हजार रुपये भाव मिळाला नाही तर कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्यांत वाढ होण्याची शक्यता आहे.

शेतमालाचा उत्पादनखर्च काढताना सदोष कार्यपद्धती आणि चुकीची आकडेवारी वापरून सरकार दुहेरी बदमाशी करत असल्याचा आरोप करून कृषिमूल्य आयोग ज्या सदोष पद्धतीने कापसाचा उत्पादन खर्च काढते, त्याच तक्त्यात जर वस्तुनिष्ठ आकडे घातले तरी कापसाचा उत्पादन खर्च ७९६६ रु. प्रतिक्विंटल एवढा निघतो. कापसाच्या उत्पादन खर्चाच्या बाबतीत शासनासोबत जाहीर चर्चा करण्याची तयारी असून सरकारने आव्हान स्वीकारावे, असेही मुटे म्हणाले आणि शेतकरी संघटनेने काढलेल्या उत्पादन खर्चाच्या तपशिलवार गोषवाऱ्याच्या प्रती मुख्यमंत्र्यासह उपमुख्यमंत्री, सहकारमंत्री, कृषीपणन मंत्री, रोजगार हमी मंत्री, सामाजिक न्यायमंत्री, पर्यावरण मंत्री, वित्तराज्यमंत्री, विधानसभा उपाध्यक्ष, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष यांना सादर केल्या. कापसाचा वास्तविक उत्पादनखर्च प्रतिक्विंटल ७९६६ रुपयांपेक्षाही जास्त निघत असतानासुद्धा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील बाजारभाव आणि महाराष्ट्र शासनाची आर्थिक कुवत लक्षात घेऊनच शेतकरी संघटनेने प्रतिक्विंटल ६००० रुपयांची मागणी केली आहे. शेतकरी संघटनेची कापसाला ६००० रुपये भाव द्या, ही मागणी जास्त नसून रास्त व व्यवहार्य आहे, याकडे मुटे यांनी शासनाचे लक्ष वेधले.

फेब्रुवारी २०११ मध्ये आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेजी असताना शासनाने निर्यातबंदी जाहीर केली त्यामुळे कापसाचे भाव सात हजार रुपयांवरून तीन हजार रुपयांवर घसरले आणि कापूस उत्पादकांचे नुकसान केले. तेजी असेल तेव्हा कापसावर निर्यातबंदी लावायची आणि मंदी असेल तेव्हा कापूस उत्पादकांना वाऱ्यावर सोडून द्यायचे ही सरकारची शेतकरीविरोधी नीती यापुढे शेतकरी संघटना खपवून घेणार नाही. कापसाला किमान ६००० रु. भाव मिळण्याची व्यवस्था करणे ही महाराष्ट्र सरकारची नैतिक जबाबदारी असून आता कोणत्याही स्थितीत विदर्भ-मराठवाड्यातला कापूस उत्पादक शेतकरी कापसाला प्रतिक्विंटल ६००० रुपये भाव मिळवल्याखेरीज शांत बसणार नाही, बऱ्या बोलाने सरकार ऐकणार नसेल तर शेतकरी रस्त्यावर उतरून सरकारला शेतकरीविरोधी भूमिका बदलण्यास भाग पाडेल, असा खणखणित इशारा शेतकरी संघटना प्रतिनिधिंनी दिला.

प्रहार संघटनेचे बच्चू कडू म्हणाले की, शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारीत भाव मिळावेत म्हणून ३० वर्षांपासून लढा देत आहे; पण सरकार लक्ष देत नाही. ही अन्यायकारक बाब असून कापसाला सहा हजार आणि सोयाबीनला तीन हजार रुपये प्रतिक्विंटल भाव मिळणे गरजेचे आहे.

प्रकाश पोहरे यांनी बहुतांश वेळ आत्मस्तुतीचे पोवाडे गाण्यातच खर्ची घातला. पोहरे म्हणाले की, मी गेली अनेकवर्षे शेतकरी समाजासाठी काम करतो आहे. मी शेतकरी संघटनेतही बरीच वर्षे काम केले आहे. मी शेती विषयावर लेख लिहीत असतो. मुख्यमंत्री साहेब ते तुम्ही वाचतच असता. मी एक आवाज दिला की हजारो लोक रस्त्यावर उतरतात. लोक माझे कट-आऊटस हातात घेऊन आंदोलने करतात, वगैरे वगैरे. आत्मस्तुती करण्याच्या नादात कापसाच्या भावाचा मुद्दा बाजुला पडत आहे हे बघून इतर प्रतिनिधींनी अहो, मुद्याचं बोला-कापसाच्या भावाविषयी बोला असा आग्रह केला तेव्हा सोन्याचे भाव सतत वाढत आहे म्हणून कापसाचेही भाव वाढून कापसालाही पाच हजार रुपये भाव मिळाले पाहिजेत, अशा तऱ्हेचा घासूनपुसून गुळगुळीत झालेला मुद्दा त्यांनी मांडला आणि ॲग्रोवनमध्ये प्रकाशित झालेला तुलनात्मक तक्ता वाचून दाखवला.

उपोषणफेम आमदार रवी राणा कापसाच्या प्रश्नावर फारसे बोललेच नाहीत. ते म्हणाले उपोषणामुळे माझी प्रकृती खूप खालावली होती. किडनीवर कशी सूज आली होती आणि त्यांना किती सलाईन लावाव्या लागल्या हे त्यांनी तपशिलवारपणे कथन केले. सरकारला पाठींबा दिला असूनही उपोषणकाळात मुख्यमंत्र्यांनी त्यांची फारशी दखल न घेतल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

शेतकरी संघटक प्रतिनिधी

शेतकरी संघटनेच्या वतीने विविध ठिकाणी रास्ता रोको

कापसाची सहा हजार रुपये, सोयाबिनची तीन हजार रुपये, तुरीची पाच हजार रुपये आणि धानाची एक हजार सहाशे रुपये आधारभूत किंमत जाहीर करावी, थकित वीजबिलापोटी शेतातील विजपुरवठा खंडीत करणे थांबवावे, कापूस निर्यातीवरील सर्व बंधने हटवावी व कापूस बाजार नियंत्रणमुक्त करावा, बिगरबासमती तांदळावरील निर्यातबंदी कायमस्वरुपी हटविण्यात यावी, संपूर्ण शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती, सर्व शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव मिळावा, ग्रामिण भागातील लोडशेडींग बंद करण्यात यावे, आघाडी सरकारच्या जाहिरनाम्यातील आश्वासनाप्रमाणे वीज बिलातून शेतकऱ्यांची संपूर्ण मुक्तता करण्यात यावी इत्यादी प्रश्नाची कायमची सोडवणूक करून घेण्यासाठी आंदोलनाची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आंदोलनाचा पहिला टप्पा म्हणून १९ नोव्हेंबर २०११ ला राज्यव्यापी एक तासाचे लाक्षणिक स्वरुपाचे रास्तारोको आंदोलन करण्यात आले.

वायगाव निपाणी - १९ नोव्हेंबरला दुपारी १२ ते १ दरम्यान वायगाव चौरस्ता (जि. वर्धा) येथे हजारो शेतकऱ्यांनी शेतकरी संघटनेच्या महिला आघाडीच्या प्रांताध्यक्ष माजी आमदार सरोज काशीकर आणि शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष गंगाधर मुटे यांच्या नेतृत्वाखाली वायगाव चौरस्त्यावर वाहतूक अडवून १ तास वाहतूक रोखून धरली.

पूलगाव - स्थानिक कापड गिरणीसमोर शेतकरी संघटनेच्या वतीने चक्काजाम आंदोलन करण्यात आले. दुपारी १२ वाजता आर्वी-अमरावती-पूलगाव मार्गावर एकतास वाहतूक खोळंबली होती. आंदोलनाच्या ठिकाणी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सभेनंतर ५० महिला व २५० पुरुष शेतकऱ्यांना बी.पी. ॲक्टनुसार स्थानबध्द करून कलम ६९ अन्वये सुटका करण्यात आली. मोर्चात परिसरातील ग्रामीण भागातून किमान ५०० शेतकरी सहभागी झाले होते. आंदोलनाचे नेतृत्व नंदुभाऊ काळे, सतिश दाणी, सचिन डाफे यांनी केले.

समुद्रपूर- शेतकरी संघटनेतर्फे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७ वर चक्काजाम आंदोलन केले. आंदोलनामध्ये तालुक्यातील ३ हजार शेतकरी सहभागी झाले होते. दरम्यान, दीड तास वाहतूक ठप्प झाल्याने चंद्रपूर व नागपूर, हैद्राबाद व उमरेड मार्गावर हजारो वाहनांची रीघ लागली होती. पोलीस प्रशासनाजवळ तीन हजार कार्यकर्त्यांना अटक करण्याची व्यवस्था नसल्याने केवळ २५ लोकांना अटक केली. आंदोलनाचे नेतृत्व प्रा. मधुकर झोटींग, मधुसूदन हरणे,वसंतराव निखाडे, वसंतराव दोंदल, अजाबराव राऊत, उल्हास कोटमकर, जीवन गुरनुले यांनी केले.

केळझर - नागपूर - वर्धा महामार्गावरील सेलडोह येथे शेतकरी संघटनेच्यावतीने कापूस व सोयाबीन या पिकांना भाववाढ द्या, या मागणीकरिता शेतकरी संघटनेच्यावतीने रास्तारोको आंदोलन करण्यात आले. आंदोलनाचे नेतृत्व निळकंठ घवघवे, किसना वरघणे, जैतराम खोडे, शारदा उंबरकर, श्रावण खोडे, मणीराम धनोरे, गावंडे, अरविंद बोरकर यांनी केले.

वडनेर - येथे महामार्गावर रस्ता रोको आंदोलन केले. आंदोलनात दत्ता राऊत, सिंधुताई इखार यांचा मुख्य सहभाग होता.

आर्वी- येथील तळेगाव-वर्धा-पुलगाव टी पॉईंटवर शेतकरी संघटनेने दुपारी १२ ते २ वाजेपर्यंत रस्तारोको आंदोलन केले. आंदोलनाचे नेतृत्व शैलेजा देशपांडे यांनी केले. या आंदोलनात ३४ आंदोलकांना ताब्यात घेतले. या वेळी आनंदवाडी, चिस्तुर, चिंचोली, धनोडी, बहाद्दरपूर, वर्धमनेरी, दहेगाव गोंडी, पाचेगाव, रोहणा, देऊरवाडा, टाकरखेडा, जळगाव, वाढोणा आदी गावातील शेतकऱ्यांचा समावेश होता.

'रिटेल'मधील परकीय गुंतवणुकीचे शेतकऱ्यांकडून स्वागत

पाठिंब्यासाठी धुळ्यात शेतकरी संघटना रस्त्यावर

धुळे : रिटेलमधील परकीय गुंतवणुकीस परवानगी देण्याच्या निर्णयाचे शेतकरी संघटनेने स्वागत केले आहे. पंतप्रधान डॉ. मनमाहेन सिंग यांचे मनोधैर्य वाढावे म्हणून आज शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रवी देवांग यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी आंदोलन करीत स्वागत केले. दरम्यान, व्यापाऱ्यांनी पुकारलेल्या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शेतकरी संघटनेने नेहरू चौकातील कार्यालयासमोर आंदोलन केले. श्री. देवांग यांनी सांगितले, की 'एफडीआय'चे स्वागत म्हणजे बळीराज्याच्या दिशेने एक पाऊल आहे. थेट परकीय कंपन्यांची भारतात किरकोळ उद्योग क्षेत्रात गुंतवणूक, किराणा, हार्डवेअर, आदी क्षेत्रांत पायाभूत सुविधा म्हणजेच शेतकऱ्यांकडून डायरेक्ट शेतीमालाची खरेदी. कृषी उत्पन्न बाजार समितीशिवाय ही खरेदी होईल. तो माल ग्राहकाला पुरविण्यात येईल. त्यासाठी कोल्ड स्टोअरेज, कोल्ड व्हॅन, प्रक्रिया उद्योगांची उभारणी होईल.

बाजार समित्यांची मक्तेदारी संपेल. शेतकरी, ग्राहक व बेरोजगारांचा लाभ होईल. धरणे आंदोलनास

परवानगी नाकारणाऱ्या पोलिसांचा या वेळी धिक्कार करण्यात येईल. त्यासाठी येत्या १० व ११ डिसेंबर तारखेला नागपूर येथे शेतकरी संघटनेच्या वतीने 'शेतकरी समांतर विधानसभा' घेण्यात येईल, असे श्री. देवांग यांनी म्हटले आहे. आंदोलनात कडूअप्पा पाटील, शांतूभाई पटेल, आत्माराम पाटील, अवचित देवरे, रामदास जगताप, निंबा पाटील, अविनाश साहेबराव पाटील, पोपटराव देवरे, मुरलीधर पाटील, सुनील वाघ, एम.ओ. निकम, रविंद्र चौधरी, दत्तू बेडसे आदी कार्यकर्ते व शेतकरी सहभागी झाले होते.